
पंचभूतांचें काष्ठ। भोग भोगावया अवशिष्ट। भोग सरतां पडेल निचेष्ट। होईल विस्पष्ट ही राख॥ तुमची माझी हीच स्थिती। तियेची तुम्हांस व्हावी स्मृती। अहर्निश मजही जागृती। तदर्थ विभूति देतसें॥ अखिल विश्व मायाविजृंभित। ब्रह्म सत्य, ब्रह्मांड अनृत। याची खूण ही उदी सत्य। निश्चितार्थ हा माना॥ येथें नाहीं, कोणी कुणाचें। दारा, पुत्र, मामे, भाचे। नग्न आलों नग्न जायाचें। उदी ही याचें स्मारक॥ उदीचें या केलिया चर्चन। आधि-व्याधि होती निरसन। परी या उदीचा तत्त्वार्थ गहन। विवेकपूर्ण वैराग्य॥ देववेल ती देऊनि दक्षिणा। साधाया प्रवृत्ती वैराग्यलक्षणा। पुढें मग निवृत्ती वैराग्यखुणा। कळतील आपणां हळूहळू। आलें जरी वैराग्य हातीं। विवेक जरी नाहीं संगतीं। तरी तयाची होईल माती। म्हणून विभूति आदरा॥ विवेक-वैराग्यांची जोड। तीच ही विभूति-दक्षिणेची सांगड। बांधिल्यावीण भवनदीची थड। अति अवघड गांठावया॥ लहान थोर दर्शना येत। चरणीं बाबांचे होऊनि विनत। जेव्हां जेव्हां माघारां जात। विभूती देत त्यां बाबा॥ मशिदींत नित्याची धुनी। अक्षयी प्रदीप्त निशिदिनीं। त्यांतील मूठमूठ रक्षा देऊनि। बाबा बोळवणी करीत॥ प्रसाद म्हणून रक्षा देत। निजांगुष्ठें निढळा फांसीत। सर्वेचि तो हस्त शिरीं ठेवीत। कल्याण इच्छित भक्तांचें॥ रक्षा विभूती आणि उदी। शब्द तीन परी एकार्थवादी। हाचि प्रसाद नित्य निरवधी। बाबा अबाधित वांटीत॥ संसार आहे उदीसमान। हें एक या उदीचें महिमान। येईल ऐसा एक दिन। मनीं आठवण ही ठेवा॥ कमल-दल-जलसमान। नश्वर हा देह होईल पतन। म्हणूनि याचा त्यागा अभिमान। उदीप्रदान दावी हें॥ सकळ विश्वाचा हा पसारा। राखरांगोळीसम निर्धारा। करा जगन्मिथ्यात्वविचारा। सत्यत्वा थारा उदींत॥ उदी म्हणजे केवळ माती। नामरूपाची अंतिम गती। वाचारंभण विकार जगतीं। मृत्तिके प्रतीति सत्यत्वें॥ स्वयें बाबाही प्रेमांत येतां। ऐकिले आहेत गाणें गातां। त्यांतील चुटका उदीपुरता। परिसिजे श्रोतां सादरता॥ ''रमते राम आयोजी आयोजी। उदियां की गोनियां लायोजी''॥ लागतां मनाची लहर। होऊनियां हर्षनिर्भर। इतुकेंच ध्रुपद वरचेवर। अति सुस्वर म्हणत ते॥ सारांश, ही बाबांची धुनी। प्रसवली कितीक उदीच्या गोणी। नाहीं गणाया समर्थ कोणी। परम कल्याणी ही उदी॥ परिसोनि उदीदानगुह्यार्थ। तैसाच परमार्थ आणि भावार्थ। पुसती श्रोते शुद्ध स्वार्थ। योगक्षेमार्थ उदीचा॥ उदीपोटीं हाही गुण। महती कैसी वाढेल यावीण। साई परमार्थमार्गींचा धुरीण। स्वार्थ साधून परमार्थ दे॥ बाबा देहधारी असतां। आधीं तयांचे पायां न पडतां। कोणीही कवण्याही कार्यानिमित्ता। अनुज्ञा न घेतां जाईना॥ असो लग्न वा मौंजीबंधन। मंगलकार्य विधिविधान। कार्य कारण वा प्रयोजन। लागे अनुमोदन बाबांचें॥ विना तयांचें पूर्ण अनुज्ञापन। उदीप्रसाद आशीर्वचन। होणार नाहीं कार्य निर्विघ्न। भावना पूर्ण सकळांची॥ देहधारी म्हणूनि जित। समाधिस्थ जे ते काय मृत। साई जननमरणातीत। सदा अनुस्यूत स्थिरचरीं॥ वन्ही जैसा काष्ठीं गुप्त। दिसेना परी तदंतर्हित। घर्षणप्रयोगें होई प्रदीप्त। तैसाच भक्तार्थ हा साई॥ एकदां जो प्रेमें देखिला। तयाचा आजन्म अंकित झाला। केवळ अनन्य-प्रेमाचा भुकेला। तयाच्या हांकेला ओ देई॥ नलगे तयासी स्थळ वा काळ। उभा निरंतर सर्व काळ। कैसी कोठून दाबील कळ। करणी अकळ तयाची॥ ऐसी कांहीं करील रचना। मनांत येतील कुतर्क नाना। तों तों दृष्टी ठेवितां चरणां। ध्यानधारणा वाढेल॥ ऐसें झालिया एकाग्र मन। घडेल अत्यंत साईचिंतन। हेंच हा साई घेई करवून। कार्यही निर्विघ्न पार पडे॥ व्यवहार नलगे सोडावयास। सुटेल आपोआप हव्यास। ऐसा हा मना लावितां अभ्यास। कार्यही अप्रयास घडेल॥ कर्मभूमीस आलासे देह। कर्में घडतील निःसंदेह। स्त्री, पुत्र, वित्त आणि गेह। यथेच्छ परिग्रह होवो कां॥ होणार तें होऊं द्या यथेष्ट। सद्गुरुचिंतन आपुलें अभीष्ट। संकल्प विकल्प होतील नष्ट। संचित अनिष्ट टळेल॥ पाहोनियां भक्तभाव। कैसे साई महानुभाव। दावीत भक्तांस एकेक अनुभव। वाढवीत वैभव भक्तीचें॥ वाटेल तैसा वेष घेती। मानेल तेथें प्रकट होती। भक्तकल्याणार्थ कुठेंही फिरती। शिष्य भावार्थी पाहिजे॥ साईबाबांच्या छबीचें दर्शन। तेंही प्रत्यक्ष दर्शनासमान। भाव मात्र असावा पूर्ण। वेळेवर खूण पावाल॥ असो जो भक्त अनन्यभाविक। जो जो जे जे अर्थी कामुक। असो ऐहिक वा आमुष्मिक। साई फलदायक समर्थ॥ एकाचिया दशगुणें देतां। दशगुणें अधिकार दशगुणें सत्ता। हा तों अनुभव हातोहाता। सकळांदेखतां बाबांचा॥ शिवाय परमार्थाची दृष्टी। वाढीस लागे निष्ठेच्या पोटीं। ही काय आहे सामान्य गोठी। विचित्र हातोटी बाबांची॥ काय बाबांच्या उदीचें महिमान। उदी शंकराचेंही भूषण। भावें भाळीं करी जो चर्चन। विघ्ननिरसन तात्काळ॥ करूनि मुखमार्जन स्नान। करी जो नित्य उदी विलेपन। चरणतीर्थसमवेत पान। पुण्यपावन होईल तो॥ शिवाय या उदीचा विशेष। सेवितां होईल पूर्णायुष। होईल पातकनिरसन अशेष।

सुखसंतोष सर्वदा ।। तंव तो साई करुणामूर्ती । आश्वासिता होय तयांप्रति । मशिदीच्या आश्रया जे येती । तयां न दुर्गती कल्पांतीं ।। मशीद नव्हे ही द्वारावती । येथें जयांचे पाय लागती । तात्काळ क्षेम आरोग्य पावती । येईल प्रतीति तुम्हांही ।। येथें येतां आराम न पडे । हें तों कालत्रयींही न घडे । जो या मशिदीची पायरी चढे । तयाचे बेडे पार जाणा । ऐसें हें महापुरुषदर्शन । भाग्यें लाधतां आश्वासन । कल्याणकारक आशीर्वचन । तेणेंच निर्मूलन व्यार्थीचें ।। प्रसंग बरवा वा बिकट । कार्य असो इष्टानिष्ट । आधीं साईंस पुसावी वाट । परिपाठ हा थोपट शिरडींत ।। मग तें जैसें जैसें कथिती । आचरावें तैसे स्थितीं । तेच भक्तसंकट निवारिती । वर्णावे किती अनुभव ।। जो जो कुतर्के निघे । जरी आपुल्या कृतनिश्चया जागे । अखेर तोही दर्शनयोगें । शरण रिघे साईंस ।। जो जो साईंस पाहूं सरला । तो तो जागचे जागींच ठेला । पुनश्च नाहीं मागें परतला । पायींच रतला साईंच्या ।। धरूनियां दांतीं तृण । जैसें कोणीं यावें शरण । तैसियेपरी वंदी चरण । पावोनि विस्मरण निश्चया ।। जगांत ऐशा कित्येक जाती । परोपकारी भक्तांच्या असती । तयांची कराया संशयनिवृत्ती । बाबा आणिती धरधरूं ।। मग ते जेव्हां माघारा जाती । आपुले अनुभव इतरां कथिती । लिहवूनि घेती कोणाही हातीं । जना सत्पथीं लावाया ।। तात्पर्य हे जे कोणी जाती । दर्शनसुखें तृप्त होती । आरंभीं कैसीही तयांची वृत्ती । परमानंदप्राप्ती अखेर ।। म्हणोत आपुले पायीं जाती । असे ना कां चिकित्सा-प्रीति । परी निराळी वस्तुस्थिती । कार्य साधिती बाबांचें ।। बाबाचि तयां देती स्फूर्ती । तेव्हांचि बाहेर पाय काढिती । चेववूनि स्वाभाविक वृत्ती । लाविती परमार्थी तयांस ।। कोण जाणे तयांच्या कळा । जाणूं जातां होतील अवकळा । होऊनि निरभिमान पायीं लोळा । भोगाल सोहळा सुखाचा ।।

जाहली संशयनिवृत्ती । साई साधु ही अभिव्यक्ती । जया मनीं जैसी वृत्ती । तैसीच अनुभूती दाविली ।। ज्या ज्या मार्गें जाऊं इच्छिती । तो तोच मार्ग तया लाविती । साई जाणती अधिकारसंपत्ती । परमार्थप्राप्तीही त्या मार्गें ।। भक्त भावार्थी अथवा टवाळू । साई समत्वें दोघांसी कृपाळू । एकास टाळूं दुजिया कवटाळूं । नेणे ही कनवाळू माउली ।। भक्तिज्ञानवैराग्यहीन । ऐसा जो भक्त तो अति दीन । तयास प्रथम वैराग्यीं स्थापून । भक्तिज्ञान मग देती ।। करविती जें दक्षिणाप्रदान । तीच वैराग्याची खूण । पुढें भक्तिपंथास लावून । ज्ञानप्रवीण करवीत ।। काय वानूं ही साईंची कुसरी । हें सर्व जरी तो स्वयेंच करी । बाह्यात्कारी अलिप्तता धरी । नवलपरी ती काय दुजी ।। कोणी करा वा न करा वंदन । द्या अथवा न द्या दक्षिणादान । आनंदकंद साई दयाघन । करी न अवगणन कोणाचें ।। पूजिल्याचा नाहीं आनंद । अवमानिल्याचा नाहीं खेद । हर्ष न येथें कैंचा विषाद । पूर्ण निर्द्वंद्व ते हे स्थिती ।। असो कोणाचा कांहींही हेत । एकदा जयासी दर्शन देत । तयाची भक्ती पायीं जडवीत । शक्ती ही अद्भुत साईंची ।। साईसमर्थ कृपामूर्ती । तयां आधीन आमुची गती । कृपा उद्भवेल तयांचे चित्तीं । तेव्हांच येतील दर्शना ।। ऐसें तेथील गमनागमन । नसतां साईंचें चित्त प्रसन्न । होई न कोणासही आज्ञापन । उदीप्रदानसमवेत ।। करूनियां अभिवंदन । मागूं जातां आज्ञापन । उदीसमवेत आशीर्वचन । तेंच आज्ञापन निघावया ।। हा सच्चरित मार्ग थोपट । जेथें जेथें याचा पाठ । तेथेंच द्वारकामाईचा मठ । साईही प्रकट निश्चयें ।। तेथेंच गोदावरीचें तट । तेथेंच शिरडी क्षेत्र निकट । तेथेंच धुनीसकट । स्मरतां संकट निवारी ।। जेथें साईचरित्रपठण । तेथें सदैव साईनिवसन । श्रद्धापूर्वक चरित्रावर्तन । करितां तो प्रसन्न सर्वभावें ।। स्मरतां साई स्वानंदघन । जपतां तन्नाम अनुदिन । नलगे इतर जपतप-





साधन। धारणाध्यान खटपट॥ साईचरणीं ठेवूनि प्रीति। जे जे या साईंची विभूती। नित्यनेमें सेविती लाविती। ते ते पावती मनेप्सित॥ धर्मादि चारी पुरुषार्थ। पावोनि होती ते कृतार्थ। प्रकट होतील सकल गुह्यार्थ। स्वार्थपरमार्थ-समवेत॥ महापापादि पापें प्रबळ। तैसींच उपपातकेंही सकळ। उदीसंपर्कें होतीं निर्मूळ। लाधे निर्मळता सबाह्य॥ तो हा परात्परसरोवरहंस। हंस:सोहंवृत्ती-उदास। ब्रह्म-मुक्तसेवनोल्लास। असमसाहस जयास॥ जया नसतां नांव गांव। अंगीं अपरंपार वैभव। क्षणें करील रंकाचा राव। भ्रुकुटीलाघव हें ज्याचें॥ तो हा तत्त्वज्ञानावतार। दावी साक्षित्वें साक्षात्कार। नामानिराळा राहूनि दूर। घडवी प्रकार नानाविध॥ तो जयावरी करी कृपा। दावी तया विविधरूपा। अघटित घटना रची अमूपा। प्रौढप्रतापा परिसा त्यां॥ तया जें जे आकळिती ध्यानें। अथवा गाती प्रेमळ भजनें। पडों नेदी तयांचें उणें। सांभाळी पूर्णपणें तयांतें॥ आवड निजकथांची बहुत। म्हणोनि आठव देई अनवरत। करोनि श्रोत्यावक्त्यांचें निमित्त। पुरवी मनोरथ भक्तांचे॥ परमार्थाचा पूर्ण अभिमानी। प्रपंचावर सोडोनि पाणी। जयानें जोडिला चक्रपाणी। अनंत प्राणी उद्धरिले॥ देशीं विदेशीं जयातें भजत। भक्तिध्वज जयाचा फडकत। दीना दुबळ्या पालवीत। कामना पुरवीत सकळांच्या॥ साई द्रव्य न याचीत। निजभक्तांसही याचूं न देत। अर्थ हा नित्य अनर्थ मानीत। भक्तां न पाडीत तन्मोहीं॥ साई सज्जन स्वयें अवतार। महा-वैष्णवसा आचार। ज्ञानद्रुमाचा कोंभचि साचार। शोभे हा भास्कर चिदंबरी॥ खरें कराया भक्तवचन। प्रणतपाळ करुणाघन। साई दयाळ भक्ताश्वासन। लडिवाळपण पुरवीत॥ धन्य धन्य साईचें चरित। धन्य तयाचें नित्यचरित। क्रियाही अकळ अत्यद्भुत। इत्थंभूत अकथ्य॥ अगाध त्याचें सच्चरित। धन्य तयाचें जीवनवृत्त। धन्य धन्य तें अप्रतिहत। असिधाराव्रत तयाचें॥ कधीं ब्रह्मानंदें उन्मत्त। कधीं ते निजबोधें तृप्त। कधीं सर्व करूनि अलिप्त। ऐसी अनिश्चित ती स्थिती॥ कधीं सर्वप्रवृत्तिशून्य। तरी तो नव्हे निद्रासंपन्न। निजस्वार्थीं ठेवूनि मन। सदा सावधान निजरूपीं॥ कधीं सागरासम प्रसन्न। परी तो दुरंत दुर्विगाह्य गहन। कोणा हें अगाधरूप निरूपण। यथार्थपणें करवेल॥ पुरुषांसवें धरी बंधुता। स्त्रिया तयाच्या बहिणी माता। ब्रह्मचारी ऊर्ध्वरेता। ठावा समस्तां सर्वदा॥ ऐसियाचे सत्संगतीं। प्राप्त झाली जी मति। तीच राहो निश्चल स्थिती। निधनप्राप्तीपर्यंत॥ उदंड व्हावी सेवावृत्ती। चरणीं जडावी अनन्य भक्ती। भगवद्भाव सर्वांभूतीं। अखंड प्रीति तन्नामीं॥ पाहोनि त्याच्या एकेक कृती। जे जे कारण शोधूं जाती। ते ते कुंठित होऊनि अंतीं। स्वस्थचि बैसती तटस्थ॥ काय ती परमहंसस्थिती। श्रीसाईंची निजसंपत्ती। काळें चोरिली हातोहातीं। दिसेल मागुती ती काय॥ धनसुतदारासक्त भक्त। राहूं द्या कीं यांची मात। दर्शना येत योगी विरक्त। राहत आसक्त पदकमलीं॥ काम-कर्म-बंधविमुक्त। सर्वैषणा-विनिर्मुक्त। देह-गेहादिकीं विरक्त। जगीं भक्त तो धन्य॥ साई जयाचा दृष्टिविषय। तया वस्त्वंतर दिसेल काय। दृश्यमात्रीं साईशिवाय। रिकामा ठाय दिसेना॥ वदनीं श्रीसाईचें नाम। हृदयीं श्रीसाईचें प्रेम। तया नित्य आराम क्षेम। रक्षी स्वयमेव साई त्या॥ श्रवणाचीही तीच गत। शब्द नाहीं साईव्यतिरिक्त। घ्राणीं साईपरिमळ भरत। रसना पघळत साईरसें॥ सुखाचें जें सोलींव सुख। काय साईचें सुहास्य मुख। धन्य भाग्याचा तो देख। जेणें तें शब्दपीयुख सेविलें॥ कल्याणाचें निधान। सुखशांतीचें जन्मस्थान। सद्सद्विवेकवैराग्यवान। सदा सावधान अंतरीं॥ यथेच्छ रमतां इन्द्रियार्थीं। अंतरीं ठेवा साईप्रीति। तोचि कामा येईल अंतीं। स्वार्थीं परमार्थीं उभयत्र॥ होय जेणें चित्तशुद्धी। जेणें अखंड ब्रह्मसिद्धी। तें स्वधर्माचरण आधीं। तप हें साधीं नरदेहें॥ साधुसेवा मुक्तीचें घर। स्त्रैणसंग नरकद्वार। हे पूज्य वृद्धजनोद्गार। विचारार्ह सर्वथा॥ सदा सदाचारसंपन्न। देहनिर्वाहापुरतें अन्न। गृहदारादि स्पृहाशून्य। ऐसा जो धन्य तो साधु॥ जे जे अनिमेष चिंतिती साई। प्रचीतिची पहा नवलाई। स्वयें साई तयांस ध्याई। होऊनि उतराई तयांचा॥ धन्य नामस्मरणमहती। गुरूही भक्तस्मरण करिती। ध्याता प्रवेशे ध्येयस्थिती। पूर्ण विस्मृती परस्परां॥ "तुम्ही जाणा तुमची करणी। मज तों अहर्निश तुमची घोकणी"। ऐशी बाबांची प्रेमळ वाणी। असेल स्मरणीं बहुतांच्या॥ अखंड तन्नामावर्तन। हेंचि आम्हां व्रत तप दान। वेळोवेळीं शिरडी-प्रयाण। हेंचि तीर्थाटण आमुचें॥ "साई साई"ति नामस्मरण। याच मंत्राचें अनुष्ठान। हेंच ध्यान हेंच पुरश्चरण। अनन्य शरण या जावें॥ निष्कपट प्रेमानुसंधान। इतुकेंच खरें तयाचें पूजन। मग अंतरीं घ्या अनुभवून। अतर्क्य विंदान तयाचें॥ चावडीची येतां रात। भजनमंडळी मशिदीं येत। भजन दोन प्रहरपर्यंत। मंडपांत चालतसे॥ मागें रथ शोभायमान। दक्षिणांगीं

तुलसीवृंदावन। सन्मुख बाबा स्थानापन्न। मध्यें भक्तजन भजनार्थी।। हरिभजनी जयां आदर। ऐसे भक्त नारी नर। सभामंडपीं येऊनि सत्वर। भजनतत्पर ठाकती।। कोणी करीं घेऊनि टाळ। कोणी चिपळिया करताळ। कोणी मृदंग खंजिरी घोळ। भजनकल्लोळ मांडीत।। साईसमर्थ चुंबकमणी। निजसत्तेचिया आकर्षणीं। जडलोहभक्तां लावूनि ओढणी। नकळत चरणीं ओढीत।। हलकारे दिवट्या पाजळती अंगणीं। तेथेंच पालखी शृंगारिती कोणी। द्वारीं सज्ज वेत्रपाणी। करीत ललकारणी जयघोष।। चव्हाट्यावरी मखरें तोरणें। वरी अंबरीं झळकतीं निशाणें। नूतन वस्त्रें दिव्याभरणें। बालकें भूषणीं शृंगारिलीं।। मशिदीचिया परिसरीं। उजळत दीपांच्या बहु हारी। वारू श्यामकर्ण अंगणद्वारीं। पूर्ण शृंगारीं विराजत।। इतुक्यांत तात्या पाटील येत। घेऊनियां मंडळी समवेत। बाबांपाशीं येऊनि बैसत। निघाया उद्यत बाबांसवें।। बाबा जरी तयार असत। तात्या पाटील येईपर्यंत। जागचे जागीं बैसूनि राहत। वाट पाहत तात्यांची।। जेव्हां कांखेंत घालूनि हात। तात्या पाटील बाबांस उठवीत। तेव्हांच बाबा निघाया सजत। चावडीप्रत तेथूनि।। अंगांत नित्याची कफनी। सटका आपुला बगलेस मारूनि। तमाखू आणि चिलीम घेऊनि। फडका टाकूनि स्कंधावर।। बाबा जंव ऐसे तयार। घालिती तात्या अंगावर। जरीकांठी शेला सुंदर। करिती शिरावर सारिखा।। बाबा मग पाठील भिंतीतळीं। असे पडली सर्पणाची मोळी। तदग्रीं दक्षिणपादांगुळीं। हालवीत ते स्थळीं क्षणभर।। लगेच तेथील जळती जोत। स्वयें मारूनि दक्षिण हात। आधीं साई बुझावीत। मागूनि निघत चावडीतें।। साई जो सर्वांतर्ज्ञानी। तो काय नेणे भक्तांची छपवणी। परी तयांचें कौतुक पाहूनि। बुद्ध्याच जाणूनि मौन धरी।। सदा जयाचें सुहास्यवदन। अति सप्रेम सदय अवलोकन। तयास काय शृंगाराभिमान। राखिला हा मान भक्तांचा।। जया अंगीं भक्तीचीं लेणीं। शृंगारिला जो शांतिभूषणीं। तया या लौकिकी माळामणी। अलंकरणीं काय होत।। कीं जो वैराग्याचा पुतळा। तयास किमर्थ पाचूंच्या माळा। परी अर्पितां ओढवी गळा। भक्तांचा सोहळा पुरवी तो।। केवळ ब्रह्माची जी मूस। ओतूनि शुद्ध स्वरूपरस। आकारली जी मूर्ती सुरस। तीच कीं संतावतंस साई।। साई तोचि आत्माराम। तोचि पूर्णानंदधाम। स्वयें अवाप्त सकलकाम। करीत निष्काम भक्तांस।। जो सर्वधर्मविधारक। ब्रह्मक्षात्रतेज एक। तयांसह मृत्यूचा घोटक। लक्षण हें त्रोटक जयाचें।। मशिदीचिया अंगणांत। चूल एक मोठी रचीत। वरी विस्तीर्ण पातेलें ठेवीत। पाणी तें नियमित घालूनि।। कधीं मोठी कधीं लहान। हंडीचे या प्रकार दोन। तियेमाजीं शिजवूनि अन्न। करवीत भोजन अन्नार्थियां।। वस्तु स्वयें हातीं घेऊन। करीत दरदाम कसून। कोणी जाऊं न शके छकवून। गर्व हरून जातसे।। ऐसा हिशेबीं आव घालिती। पैही न तेथें जाऊं देती। पांच मागतां दहा देती। दाम चुकविती हातोहात।। स्वयें कामाची मोठी हौस। दुजियानें केलें न चले त्यांस। न धरती कधीं कुणाची आस। परी न त्रास कवणाचा।। हें एक तत्त्व बाबांपाशीं। होतें जागृत अहर्निशीं। म्हणून या हंडीचे कार्यासी। साह्य न कोणाशीं मागत।। हंडीच काय धुनीच्या लगत। सर्पणाचे खोलीची भिंत। पूर्वभागाची तीन चतुर्थ। स्वहस्तरचित बाबांची।। महादू करी कर्दमगारा। बाबा थापी घेऊनि निजकरा। रचीत विटांच्या थरावर थरा। भिंती उभारावयास।। आणीक बाबा काय न करिती। मशीद आपण स्वयें





सारविती। हातीं कफनी लंगोट शिवती। आंस न ठेविती कवणाची।। शिवाय ठावी कोणास ज्ञाती। मशिदीं वसती यवन म्हणती। परी तयांची आचरिती रीति। पाहूनि जाती कळेना।। असता जरी मुसलमान। कैसें मशिदींत अग्न्याराधन। असतें कां तेथ तुलसीवृंदावन। घंटावादन साहता कां।। करूं देता शंखस्फोरण। सवादित्र कथा कीर्तन। टाळ घोळ मृदंगवादन। हरिनामगर्जन मशिदीं।। असता जरी मुसलमान। मशिदींत स्वयें बैसून। करूं देता कां गंधचर्चन। तेथ सहभोजन करिता कां।। असता जरी मुसलमान। असते काय सविंध कान। निजपल्लवचे दाम वेंचून। करिता कां जीर्णोद्धारण देऊळाचें।। धारण करिता कां स्नानोत्तर। महावस्त्र पीतांबर। उलट आराध्य दैवतीं अनादर। झालिया क्षणभर खपत नसे।। असत्य चालेना साईंप्रति। असत्यें नाहीं साईंची प्राप्ती। असत्यें जाणें अधोगती। अंतीं दुर्गती असत्यें।। माध्यान्हपूजा झालियावरती। प्रत्यहीं होतां बाबांची आरती। भक्तजन जंव माघारा परतती। उदी तंव देती समस्तां।। मशिदीचिया धारेवरती। बाबा येऊनि उभे ठाकती। भक्तगण अंगणीं तिष्ठती। चरण वंदती एकेक।। पायांवरी ठेवूनि डोई। जो जो सन्मुख उभा राही। तया एकेका भाळीं ते समयीं। लावीत साई उदीतें।। "आतां समस्तीं लहानथोरीं। जावें जेवाया अपुलाल्या घरीं"। वंदूनि बाबांची आज्ञा ही शिरीं। जन माघारीं परतत।। फिरतां मग बाबांची पाठ। पडदा ओढीत यथा परिपाठ। ताटावाट्यांचा खणखणाट। होई मग थाट प्रसादाचा।। साईकरस्पर्शें पूत। नैवेद्यशेष मिळावा परत। म्हणोनि मार्गप्रतीक्षा करीत। कित्येक बैसत अंगणीं।। येरीकडे निंबरानिकट। बाबा जंव बैसती करूनि पाठ। दोहीं बाजूंस पंक्तींचा थाट। आनंद उद्भट सकळिकां।। जो तो आपापला नैवेद्य सारी। साई समर्थांचिया पुढारीं। तेही मग एका ताटाभीतरीं। निजकरें करीत एकत्र।। तें बाबांच्या हातींचें शित। लाधाया पाहिजे भाग्य अमित। जेणें भोक्ता सबाह्य पुनीत। सफल जीवित तयाचें।। वडे अपूप सांजोऱ्या पुरिया। कधीं शिखरिणी घारगे फेणिया। विविध शाका खिरी कोशिंबिरीया। बाबा मग बरविया एकवटती।। एणें विधी मग तें अन्न। बाबा करीत ईश्वरार्पण। मग शामा-नानांकडून। ताटें भरभरून वाढवीत।। पुढें एकेकास बोलावून। आपुलेपाशीं बैसवून। परमानंदें प्रीति करून। आकंठ भोजन करवीत।। खमंगघृतें जो सुखाडला। पोळीवरान्न इंहीं मिसळिला। ऐसा करूनि गोड काला। बाबा सकळांला वाढीत।। धन्य धन्य शिरडी स्थान। धन्य द्वारकामाईभुवन। जेथें श्रीसाई पुण्यपावन। आनिर्वाण-वावरले।। "बोलेल तो करील काय। गरजेल तो वरसेल काय"। या रूढ म्हणीचा प्रत्यय। विनाव्यत्यय साई दे।। बाबांसारिख्या अवतारमूर्ती। परोपकारार्थ जगीं अवतरती। होतां इच्छितकार्या समाप्ती। अंतीं अव्यक्तीं समरसती।। धन्य धन्य श्रीसाईसमर्थ। ग्रंथरूपें स्वार्थ परमार्थ। बोधूनि भक्तां करी कृतार्थ। जो कृतकार्यार्थ संपादी।। निज तान्हिया कनवाळू माई। तैसा निजभक्तां प्रत्यक्ष साई। वसो कुठेंही धांवत येई। कवण त्या होईल उतराई।। यश-श्री-औदार्य-ज्ञान। शांती-वैराग्य हे षड्गुण। इंहीं श्रीसाई भगवंत पूर्ण। ऐश्वर्यें संपूर्ण हरि जैसा। किती हो आमुचें भाग्य गहन। जेणें हा साई चैतन्यघन। विनाअर्चन-पूजन-भजन। देई दर्शन आम्हांतें।। म्हणती भक्तिपाशीं देव। आम्हांपाशीं भक्तीचा अभाव। परी हा साई महानुभाव। कनवाळू स्वभाव दीनार्थ।। जयां परमार्थीं खरी गोडी। तयांसी साईस मोठी आवडी। वारूनि सर्व तयांचीं सांकडीं। स्वानंदजोडी दे तयां।। साई बाह्यक्रोधाभिभूत। अंतरीं ते नित्य मुदित। बाह्यसंतापें दिसत संतप्त। अंतरीं ते तृप्त आनंदें।। क्रोधाचें बाह्य लौकिक लाघव। अंतरीं परमानंद-गौरव। तया साईंचें लीला-वैभव। गावया सुदैवचि पाहिजे।। साधावया निजस्वार्थ। जया पोटीं अत्यंत आर्त। शिव्या पुष्पलाखोल्या मानीत। दृष्टीं निजहितत्पर।। नित्य स्मरतां सद्गुरुचरण। विरे विघ्नांचें विघ्नपण। मरणासीही येईल मरण। पडे विस्मरण भवदुःखा।। प्रसंग सोपा व्यवहाराचा। बोध अवघा परमार्थाचा। ऐसी उपदेशपर साईंची वाचा। प्रेमरसाचा परिपाक।। बोलूनि सोपी प्रपंचभाषा। आंखीत परमार्थरूपरेषा। न काढितां कोणाच्या वर्मा दोषा। शिष्यसंतोषा राखीत।। हें सकल दृश्य चराचर। याच्याही पैल परात्पर। साई भरलासे निरंतर। जो अज अमर तो साई।। घेऊनि देहमायेची बुंथी। संत सृष्टीमाजी अवतरती। होतां उद्धार-कार्यपूर्ती। तात्काळ समरसती अव्यक्तीं।। नट धरितो वेष नाना। अंतरीं पूर्ण जाणे आपणा। तया अवतारिया परिपूर्णा। सांकडें मरणाचें तें काय।। लोकसंग्रहार्थ जो अवतरला। कार्य संपतां अवतार संपविला। तो काय जन्म-मरणाचा अंकिला। विग्रह स्वलीला धरितो जो।। परब्रह्म ज्याचें वैभव। तया कैंचा निधनसंभव। निर्ममत्व जयाचा अनुभव। क्रैचा

भवाभव त्या बाधी ।। दिसला जरी कर्मीं प्रवृत्त । कधीं कर्में केलीं यत्किंचित । सदा कर्मीं अकर्म देखत । अहंकाररहिततत्वें ।। ''नाभुक्तं क्षीयते कर्म'' । हें तों स्मृत्युक्त कर्माचें वर्म । परी ब्रह्मज्ञात्याचा न संभ्रम । देखे जो ब्रह्मचि वस्तुमात्रीं ।। क्रियाकारक फलजात । हें तों अवघें प्रसिद्ध द्वैत । तेंही ब्रह्मविद ब्रह्मचि मानीत । जेवीं कां रजत शुक्तिकेवरी ।। बाबांसारखी मायाळू जननी । पडली कैसी काळाचे वदनीं । दिवसा ग्रासी अंधारी रजनी । तैसीच ही कहाणी झाली कीं ।। साई परब्रह्म पूर्ण । तयां कैंचें जन्म-मरण । ब्रह्मसत्यत्वें जगन्मिथ्यापण । देहाचें भान कैंचें त्यां ।। प्राणधारण वा विसर्जन । अलक्ष्यरूपें परिभ्रमण । हें तों स्वच्छंदयोगक्रीडन । भक्तोद्धारणनिमित्तें ।। जया मनीं जैसा भाव । आजही तया तैसा अनुभव । हा सिद्धचि जयाचा प्रभाव । मरणभाव कैंचा त्या ।। काय त्या मशिदीची महती । सप्तपुर्‍यांत जिची गणती । 'द्वारकामाई' जीस म्हणती । बाबा निश्चितीं सदैव ।। असो निर्याण, निर्वाण वा निधन । द्वारका सायुज्यमुक्तीचें स्थान । जया ईश्वरीं नित्यानुसंधान । तया अवस्थान ये ठायीं ।। ज्ञानी अज्ञानी सर्व आश्रित । सर्वांपरी प्रेम अत्यंत । जीवाहूनि मानी आप्त । भेद ना तेथ यत्किंचित ।। हा काय एका जन्माचा निर्बंध । बहात्तर पिढ्यांचा ऋणानुबंध । भक्तांचा बाबांनीं पूर्वसंबंध । कथानुबंध कथियेला ।। साक्षात्कार कित्येकांसी । दृष्टान्तानुभव बहुतेकांसी । चमत्कार तो अनेकांसी । गुप्तरूपेंसीं दाविती ।। अभाविकां गुप्त असती । भक्तां भाविकां ठाईंचि दिसती । जैसी जयाची चित्तवृत्ती । तैसीचि अनुभूती रोकडी ।। चावडींत गुप्तरूप । मशिदींत ब्रह्मरूप । समाधींत समाधिरूप । सुखस्वरूप सर्वत्र ।। असो सांप्रत हाचि विश्वास । भक्तीं धरावा निज जीवास । भंग नाहीं समर्थसाईंस । अक्षय रहिवास अखंड ।। ऐसा आमरण ब्रह्मचर्य । आचरला जो योगाचार्य । जो ज्ञानियांचा ज्ञानिवर्य । काय तें ऐश्वर्य वानावें ।। ॐ नमो श्रीसाई चिद्घन । सकल सौख्यांचें आयतन । सकल संपदांचें निधान । दैन्यनिरसन यत्कृपा ।। करितां अवलीला चरणवंदन । समस्त पापां होय क्षालन । मग जो भावें भजन-पूजन । करी तो त्याहूनही धन्य ।। पाहतां जयाचें सस्मित मुख । विसरे समस्त संसारदुःख । ठायींच विरे तहान भूक । ऐसें अलौकिक दर्शन ।। कितीएक बहुतां वर्षांपासूनि । होती एक बाबांची जुनी । वीट, जियेवरी ते हात टेंकूनि । आसन लावूनि बैसत ।। विटेचा त्या आधार घेऊनि । नित्य एकांत होतां रजनी । बाबा मशिदींत स्वस्थ मनीं । आसन लावूनि बैसत ।। साई म्हणावें जरी देहा । तरी त्या नांवचि नाहीं विदेहा । रूपही नाहीं वस्तूसि पहा । रूपातीत श्रीसाई ।। तैसीच साईबाबांची परी । निधन केवळ लोकाचारीं । पांहू जातां स्थिरचरीं । सर्वांअंतरीं श्रीसाई ।। जैसी जयाची भजनस्थिती । तयासी तैसी नित्य प्रचीति । संदेह कांहीं न धरावा चित्तीं । मरणातीत श्रीसाई ।। साई भरला स्थिरचरीं । साई सर्वांच्या आंतबाहेरी । साई तुम्हां-आम्हांभीतरीं । निरंतरीं नांदतसे ।। साई समर्थ दीनदयाळ । भावार्थी भक्तप्रणतपाळ । परमप्रेमाचे ते भुकाळ । अति स्नेहाळ





सकळिकां ।। जरी चर्मचक्षूंसी न दिसती । तरी ते तों सर्वत्र असती । स्वयें जरी सूक्ष्मत्वीं लपती । तरीही लाविती वेड आम्हां ।। मनोभावें पूजा करितां । भक्तिभावें तयां आठवितां । अनुभव येईल सकळ भक्तां । सर्वव्यापकता दिसेल ।। नाहीं बाबा ना संवाद । आतां जरी हा ऐसा भेद । परी दृष्टी पडतां ती मशीद । गत सुखानुवाद आठवती ।। बाबांची नित्य आसनस्थिती । घ्यावया तियेची सुखानुभूती । उत्तमोत्तम आलेख्यमूर्ती । मशिदीं प्रीतिं स्थापिलीसे ।। जाहली साईदेहानिवृत्ती । प्रतिमादर्शनें होय अनुवृत्ती । वाटे निजभक्त भावार्थी । पुनरावृत्तीच ही मूर्त ।। तात्पर्य बाबा दीनदयाळ । भक्तकल्याणालागीं कनवाळ । अर्पीत बोधामृताचा सुकाळ । शिर्डींत त्रिकाळ तो परिसा ।। "जयां माझी आवड मोठी । तयांचे मी अखंड दृष्टीं । तया मजवीण ओस सृष्टी । माझियाच गोष्टी तयां मुखीं ।। तयां माझें अखंड ध्यान । जिव्हेसी माझेंच नामावर्तन । करूं जातां गमनागमन । चरित्र गायन माझें तयां ।। ऐसें होतां मदाकार । कर्माकर्मी पडेल विसर । जेथें हा मत्सेवेचा आदर । तिष्ठें मी निरंतर तेथेंचि ।। मज होऊनि अनन्य-शरण । जया माझें अखंड स्मरण । तयाचें मज माथां ऋण । फेडीत उद्धरण करूनियां ।। आधीं मज न दिधल्यावांचून । करितां भोजन-रसप्राशन । जया माझें हें निदिध्यासन । तयाआधीन मी वर्तें ।। माझीच जया भूकतहान । दुजें न ज्यांचे मजसमान । तयाचेंच मज नित्य ध्यान । तयाआधीन मी वर्तें ।। पितामाता गणगोत । आप्तइष्ट कांतासुत । यांपासाव जो परावृत्त । तोचि कीं अनुरक्त मत्पदीं ।। वर्षाकाळीं नाना सरिता । महापूर समुद्रा मिळतां । विसरती सरितापणाची वार्ता । महासागरता पावती ।। रूप गेलें नाम गेलें । जळही जाऊनि सागरीं मिसळलें । सरिता-सागर लग्न लागलें । द्वैत हारपलें एकत्वीं ।। पावोनि ऐसी समरसता । चित्त विसरलें नामरूपता । तें मजसि पाहील निजस्वभावता । नाहीं मजपरता ठाव तया ।। परिस नव्हे मी दगड । ऐसें जना करावया उघड । पुस्तकपंडितीं करोनि बडबड । लोहाचे अगड आणिले ।। तयीं मजवरी करितां घाव । उलट प्रकटतां सुवर्णभाव । माझें दगडपण जाहलें वाव । अनुभव नवलाव दाटला ।। विना अभिमान अणुप्रमाण । मज हृदयस्था यावें शरण । होईल अविद्या तात्काळ निरसन । श्रवणकारण संपेल ।। अविद्या प्रसवे देहबुद्धी । देहबुद्धीस्तव आधि-व्याधि । हीच कीं लोटी विधिनिषेधीं । आत्मसिद्धीविघातक ।। म्हणाल आतां मी आहें कोठें । आतां मी तुम्हां कैसा भेटें । तरी मी तुमचिया हृदयीच तिष्ठें । विनाकष्टें सन्निकट ।। म्हणाल हृदयस्थ कैसा कोण । कैसें काय त्याचें लक्षण । ऐसी काय तयाची खूण । जेणें त्या आपण जाणावें ।। तरी व्हावें दत्तावधान । परिसा तयाचें स्पष्ट व्याख्यान । जयालागीं जाणें शरण । तो हृदयस्थ कोण हें आतां ।। नाना नामें नाना रूपें । सृष्टीमाजीं भरलीं अमूपें । जयांचीं कवणा ना करवती मापें । मायेचीं स्वरूपें तीं अवघीं ।। तैसेंच सत्त्वरजतमगुण । तयां त्रिगुणां ओलांडून । सत्तेचें जें स्फुरे स्फुरण । तें रूप जाण हृदयस्थाचें ।। नामरूपविरहितपण । उर्वरित जें तुझें तूंपण । तेंच हृदयस्थाचें लक्षण । जाणूनि शरण त्या जावें ।। मीच तो तूं ऐसे पाहतां । हीच दृष्टी पुढें विस्तारतां । भूतमात्रीं ये निजगुरुता । ठाव न रिता मजविना ।। ऐसा अभ्यास करितां करितां । अनुभवा येईल माझी व्यापकता । मग तूं मजसीं पावूनि समरसता । पूर्ण अनन्यता भोगिसील ।। चित्स्वरूपीं अनुसंधान । लाधेल होशील शुद्धांत:करण । घडेल हें तुज गंगास्नान । गंगाजीवन नातळतां ।। प्रकृतिकर्माचा अभिमान । जेणें पावे दृढबंधन । तया बिलगूं न देती सज्ञान । अंतरीं सावधान सदैव ।। स्वस्वरूपीं मांडूनि ठाण । चळे न तेथून अणुप्रमाण । तया समाधि वा उत्थान । नाहीं प्रयोजन उभयांचें" ।। बाबा कितीदां सांगून गेले । कोणी कोणास छद्मीं बोललें । त्यानें माझेंच वर्म काढिलें । जिव्हारीं खोचलें मज जाण ।। कोणीं कोणास दुर्वचें ताडिलें । तेणें मज तात्काळ दुखणें आणिलें । तेंच जेणें तें धैर्यें सोशिलें । तेणे मज तुष्टविलें बहुकाळ ।। ऐसा भूतमात्राच्या ठायीं । अंतर्बाह्य भरला साई । एका प्रेमावांचून कांहीं । आवडच नाहीं तयातें ।। धन्य श्री साई तुझे चरण । धन्य श्रीसाई तुझें स्मरण । धन्य श्रीसाई तुझें दर्शन । जें कर्मबंधनमोचक ।। जरी सांप्रत अदृश्यमूर्ति । तरी धरितां भावभक्ति । समाधिस्थ जागती ज्योति । सद्य:प्रतीति भक्तार्थ ।। म्हणोनि कायावाचामन । करूं तुझिया पायीं अर्पण । मुखीं निरंतर नामस्मरण । होईल क्षालन पापाचें ।। केवळ पैशाचा तो प्रश्न । परिसोनि साई हास्यवदन । मनीं म्हणे हे वेडे जन । कैसें म्यां समाधान करावें ।। परी बाबांची शांती विलक्षण । स्थैर्य न ढळे अणुप्रमाण । हेंच परम शांतीचें लक्षण । आश्चर्य अवघेजण करिताती ।। क्रोध नाहीं जयाच्या गांवीं । परमशांतीच जो अनुभवी । भूतमात्रीं जो भगवंत भावी । कैशीं त्या शिवावी अविवेकता ।। विवेकदृष्टीचे जे निधडे । क्रोध येऊं न देती पुढें । विपायें जैं

हा प्रसंग जडे। भांडार उघडे शांतीचें।। "अल्ला मालिक" निरंतर ध्यान। तयाचें काय वानूं महिमान। चरित्र अगाध आणीक गहन। अतिपावन हितकर।। ज्ञानगर्भ वैराग्यनिधी। निजशांतीचा जो उदधी। करुणापरिपूर्ण जयाची बुद्धी। वदला त्रिशुद्धी ते परियेसा।। ज्यांचें क्षणैक देखिल्या वदन। होय अनंतजन्मदुःखदहन। तें परमानंद-जननस्थान। धन्य श्रीवदन साईचें।। ज्यांचें झालिया कृपावलोकन। तात्काळ कर्मबंधविमोचन। स्वानंदपुष्टी निजभक्तजन। न लागतां क्षण लाधती।। ज्यांचिया कृपादृष्टीपुढें। कर्माकर्माचें फिटे बिरडें। यत्कृपासूर्याचिया उजियेडें। भवखद्योत दडे निस्तेज।। पूर्ण तारुण्यींही अपरिग्रह। निराधार ना वेस ना गृह। तमाखू चिलीम हा काय तो संग्रह। मनोनिग्रह भयंकर।। वर्षें अष्टादश असतां वय। तेव्हांपासूनही पूर्ण मनोजय। सदा एकांतीं वसावें निर्भय। लावूनि लय स्वरूपीं।। पाहोनि भक्तांची आवडी शुद्ध। "भक्तपराधीन मी" हें ब्रीद। भक्तवृंदा दावावया विशद। भक्तप्रेमास्पद वर्ते जो।। जय परब्रह्म सनातना। जय दीनोद्धारा प्रसन्नवदना। जय चैतन्यघना भक्ताधीना। दे निजदर्शना निजभक्तां।। जयजया जी द्वंद्वातीता। जयजया जी अव्यक्तव्यक्ता। सर्वसाक्षी सर्वातीता। अकळ अभक्तां सकळिकां।। जय जय भवसंतापहरणा। जय जय भवगजविदारणा। जय जय आश्रितप्रेमपूर्णा। संकटनिरसना सद्गुरुराया।। तुज अव्यक्तीं समरसतां। आकार पावला निराकारता। परी तव भक्तकल्याणकारिता। देह ठेवितांही न सरे।। देहीं असतां जी जी कृती। तीच समरसतां अव्यक्तीं। तेच अनुभव आजही भोगिती। जे तव भक्तीं लागले।। साई सकळअवाप्तकाम। साई सकळसंतललाम। साई निजभक्त-विश्रामधाम। दुर्धरभवभ्रमनिवारक।। वदनीं



श्रीसाईंचें नाम। अंतरीं श्रीसाईंचें प्रेम। ज्याचें साईप्रीत्यर्थ कर्म। ऋणाईत परम त्या साई।। तुटावया संसारबंधन। याहूनि नाहीं अन्य साधन। साईकथा परम पावन। सदा सेवन सुखदायी।। पायीं साईसी प्रदक्षिण। करा श्रवणीं सच्चरितश्रवण। सर्वांगीं द्या प्रेमालिंगन। डोळां घ्या दर्शन साईचें।। साष्टांगीं यावें लोटांगणीं। मस्तक ठेवावें त्या चरणीं। जिव्हा लावावी तन्नामस्मरणीं। नासिकें अवघ्राणीं निर्माल्य।। साई कोणास देती आलिंगन। कोणास करिती हस्तस्पर्शन। कोणास देती आश्वासन। कृपावलोकन कोणास।। कोणाकडे पाही हास्यवदन। कोणाच्या दुःखाचें करी सांत्वन। कोणास उदीप्रसाददान। करीत समाधान सकलांचें।। काय बाबा किती दक्ष। जावो कोणाचें कोठेंही लक्ष। ते तों स्वयें अंतःसाक्ष। सर्व प्रत्यक्ष तयांतें।। साई केवळ चैतन्यमूर्ती। अव्यक्तचि ते आले व्यक्तीं। काय त्यांची निर्विषयस्थिती। कोण निश्चितीं वानील।। शिरीं जयाचा पडतां कर। अहंभावाचा होई चूर। सोहंभावाचा चाले गजर। आनंदनिर्भर दृश्यजात।। सूर्या उपमितां नाहीं सोई। कीं तो सूर्य अस्तास जाई। चंद्रा उपमूं तरी तो क्षयी। सदैव संपूर्ण साई हा।। परोपरीच्या वार्ता गहन। साई जेव्हां करीत कथन। श्रोते होत अत्यंत तल्लीन। भूक तहान विसरत।। जिहीं पाहिलें साईस्वरूप। हरले तयांचे त्रिविध ताप। ऐसा ज्यांचा तेजःप्रताप। साद्यंत केवीं वर्णावा।। ऐसा साई उदारकीर्ति। जे जे लागले त्याच्या भक्तीं। तयांचिया उद्धाराप्रति। ठेविली निजख्याती लिहून।। म्हणोनि साई समर्थ सद्गुरु। होऊनियां भवाब्धीचें तारू। आम्हीं जे केवळ कांसधरू। त्यां सर्वांस उतरू पैलपार।। महादुस्तर हा भवार्णव। करा साईचरणांची नाव। दावील निर्भय पैल ठाव। पहा नवलाव निष्ठेचा।। पाळितां या ऐशा व्रता। भासे न संसारदुःख-तीव्रता। लाभ न अन्य येणेंपरता। सेव्य समर्थता ती हीच।। साईचरणीं अत्यंत भक्ती। नयनीं कोंदो साईमूर्ती। साईच दिसो सर्वांभूतीं। ऐसी ही स्थिती भक्तां येवो।। पाठीसी असतां श्रीसमर्थ। कोणीही लावूं न शके हात। ऐसिया निर्धारें जे निर्धास्त। धन्य ते भक्त साईंचे।। भक्तांचा आधार श्रीसाई। त्यावीण विघ्नें न पडतीं ठायीं। लेकुरालागीं कनवाळू माई। येथ नवलाई काय ती।।

❑❑❑

# साई वंदना

## मनी साईनाम निवास साईधाम

सर्वांभूती चराचरी, भरला एकच ईश्वर
तोच 'अल्ला मालिक', तोच परमेश्वर....
घेण्या त्याचा शोध, अनेक पंथ - अनेक मार्ग
सोपे - अवघड - दुर्घट, रुची - शक्ती आपुली जाणा
एकच मार्ग निवडा....
चालू लागा अध्यात्माची वाट
देवाघरी नाही भेदभाव
हवी भक्ती, प्रीती न् भोळा भाव....
विसरू नका साईचे बोल, "सबका मालिक एक"
ठेवा निष्ठा साईचरणी, प्रचिती येईल ठायी ठायी....
साईठायी आहे समता-ममता
नाही तेथे साधनांची कमतरता
जाणोनि कुवत, आवड - योग्यता
लाविले अध्यात्ममार्गी समस्ता....
मनी ठेवा साईठायी शुद्ध भाव
मुखी असू द्या अखंड साईनाम
निवास ठेवा तुमचे साईधाम
लाभेल तेथे शांती, सुख - समाधान....

**- वसंत दळवी**, ठाणे.

## साई माझी आई

सारे म्हणती बाबा मी म्हणे आई
साई माझी आई – साई माझी आई ॥धृ० ॥
पाडस तुझे मी पडे ठायी ठायी
सांभाळी गे मला ममतामयी आई ॥१ ॥
मी वत्स गे तुझा असे आततायी
पुरवी लाडासी मम वत्सल आई ॥२॥
जीवनी अर्थ लागे कृपें तव साई
संतोषे समाधाने चित्त स्थिर होई ॥३ ॥
शरण तुला गे नम्र तुझे पायी
तुला भेटण्याची झाली मला घाई ॥४ ॥

**- प्रभाकर मेढेकर**, इंदूर, म.प्र.

## आनंद नि आनंदासाठी 'साईस्थिती' व्हावी !

जीवनातील जी काही
कार्ये-कर्मे करावी
डोळ्यांनी जेथे-जेथे पहावे
दृष्टी फेकावी –
कानांनीं जो नाद-आवाज
श्रवण करावा
मुखाने फक्त तुझ्याच
नामाचा उच्चार करावा –
माझा कृष्ण-साई
हरघडी प्रत्येक ठिकाणी
प्रेमाने - मायेने खुणावतोय
अशीच स्थिती व्हावी –
नि माझा त्रैलोक्यापती साई
केवळ एकाच इंद्रियाला नव्हे;
माझ्या मन-बुद्धी-चित्तांत
नित्य जडून राहिला तर –
माझ्या आत्म्याला होणारा
आनंद नि आनंद
तुलाही खरंच पहायचा असेल
तर तूही अनुभव हा आनंद !

**- भालचंद्र केशव गन्द्रे**, ठाणे.

## ॥ नवविधा भक्ती ॥

साईदेवा तुझी गाठभेट झाली।
नवविधा भक्ती उदयास आली ॥ धृ० ॥
मी जगीचा पामर तूच लळाविले।
मधाळ भक्तीच्या पाकोळीत बंद केले ॥१ ॥
**श्रवण** जीवाचे कान, जीव तुझे **कीर्तन**।
**स्मरण** फक्त तुझे ध्यान तुझे **पादसेवन** ॥२ ॥
**अर्चनी** अश्रू अभिषेका **वंदाव्या** तुझ्या पादुका।
**दास्य** तुझे मागून घ्यावे **सख्य** तुझ्यासम हवे ॥३ ॥
सुखदुःखे तुज सांगावी सर्व चिंता सोपवावी।
अंतरीचे हे रुदन तेचि **आत्मनिवेदन** ॥४ ॥
साई देवा तुझी०००००

**- विनायक स. शिंदे**, शिरडी.

# ॥ साई उवाच ॥

अध्याय ४० वा

संग्राहक : कै. प्र. का. सोमण
(निवृत्त ले. कर्नल)

(मागील अंकावरून पुढे)

पार्श्वभूमी :

डहाणूचे मामलेदार बाळासाहेब देव हे साईबाबांचे निस्सीम भक्त होते. त्यांची आई अत्यंत धार्मिक, सुशील व सात्त्विक होती. अनेक प्रकारची व्रतवैकल्ये तिने केली होती. व्रतसंख्या पूर्ण झाली; पण त्यांचे उद्यापन व्हायचे राहिले होते. या उद्यापनासाठी मोठे अन्नदान त्यांना करायचे होते व अशा मोठ्या समारंभाला बाबांनी जातीने उपस्थित राहावे, ही बाळासाहेबांची तीव्र इच्छा होती.

म्हणून बाबांना विनंती करणारे एक पत्र त्यांनी बापूसाहेब जोग यांना शिरडीस पाठविले. ते पत्र जोगांनी बाबांना वाचून दाखविले व त्यांनीही बाबांना मामलेदारसाहेबांतर्फे फार आग्रह केला. ती अत्यंत भक्तिप्रेमाने देवांनी डहाणूस येण्यासाठी बाबांना केलेली विनंती ऐकून बाबा म्हणाले :-

**''जया माझें स्मरण। निरंतर आठवण मज त्याची ॥३१॥ मज न लागे गाडीघोडी। विमान अथवा आगिनगाडी। हांक मारी जो मज आवडी। प्रकटें मी ते घडी अविलंबें ॥३२॥ तूं मी आणि तिसरा एक। तिघे मिळूनि जाऊं देख। पाठवूनि दे ऐसा लेख। पावेल हरिख लिहिणारा'' ॥३३॥**

(बाबा जे जे बोलले ते सारे जोगांनी देवांना डहाणूस पत्राने कळविले. ते अत्यंत आनंदित झाले. देव मामलेदारांचा पूर्ण विश्वास होता की, वचनाप्रमाणे बाबा व्रताच्या उद्यापनाला खात्रीने येतील. खरे म्हणजे, शिरडीजवळची तीन गावे - राहाता, रूई व निमगाव याव्यतिरिक्त बाबा दूर कुठेही जात नसत; मग डहाणूसारख्या दूरच्या ठिकाणी बाबा कसे येतील, हा प्रश्न प्रश्न देव मामलेदारांना होता !

काही दिवसांनी एक संन्यासी त्या गावी (डहाणूस) आला व तो गोरक्षणाचे धर्मकार्य करणारा गोशाळाप्रचारक, गोसंस्थेचा स्वयंसेवक होता आणि या कार्यासाठी तो वर्गणी गोळा करीत होता. डहाणू रेल्वे-स्टेशनावरील मास्तरांच्या सांगण्यावरून तो देवांना भेटला. सांप्रतचा काळ अनुकूल नसल्याने देवांनी त्याला २-४ महिन्यांनंतर यायला सांगितले. संन्यासी त्यावेळी परतला; पण देवांच्या उद्यापनाच्या दिवशी टांग्यातून तो पुन्हा आला. देवांनी त्याला पाहिले व मनात म्हटले, याला २-४ महिन्यांनंतर यायला सांगितले होते. तो लगेच आत्ताच परत कशाला आला ? नंतर तो संन्यासी देवांच्या घरी येऊन त्यांना भेटला.

सकाळी १० ही भोजन-समारंभ सुरू होण्याची वेळ होती. त्यातच या संन्याश्याला पाहून देवांच्या मनाची घालमेल सुरू झाली. तेव्हा तो संन्यासी देवांना म्हणाला, मी आज पैशासाठी उतावीळ होऊन आलेलो नाही. ''आया हूं न पैसे के लिए। आज तो हमको भोजन चाहिए''। देव म्हणाले, ''आओ, आनंद है। घर यह समझिए आपका'' ॥६४॥ त्यावर संन्यासी म्हणाला, ''हमारे दो बच्चे हैं साथ''। देव म्हणाले, ''बहोत अच्छी है यह बात''। पुढे देवांनी संन्याश्याला विचारले की, जेवणाची तयारी झाल्यावर मी तुम्हाला कुठे बोलवायला पाठवू ? संन्यासी म्हणाला, ''क्या जरूर ? कब मैं आऊं। किस घंटे मैं हाजर रहूं। जब बोलोगे तब आता हूं''..... ॥६७॥ देवांनी त्याला त्याच्यासोबतच्या दोन मुलांसह १२ वाजता भोजनास येण्यास सांगितले.

देवांच्या मनात त्या दरम्यानच्या काळात हा आगंतुक, न निमंत्रण केलेला संन्यासी भोजनाच्या वेळी भोजनासाठी आला आहे, हीच भावना कायम होती. संन्यासी यथेच्छ भोजन करून दोन मुलांसह परत गेला.

जेवणाची पंगत उठली, सर्व आवराआवरी झाली; पण वचन दिल्याप्रमाणे, बाबा उद्यापनास आले नाहीत, या कल्पनेने देवांनी जोगांना मोठे पत्र लिहिले. त्यात, तुम्हीपण बाबांबरोबर याल, असे वाटले होते; पण फारच निराशा झाली.....वगैरे लिहिले. बाबा आल्याची काहीच प्रचीती त्यांना आली नाही व बाबांनी त्यांना फसविले, हेही त्यांनी पत्रात लिहिले. जोगांनी ते पत्र बाबांना वाचून दाखविले, तेव्हा बाबा म्हणाले :- **''पत्र उकलतां मजपुढती। पत्रांतर्गत मनोवृत्ती। वाचावयाचे आधींच निश्चिती। उभ्याच ठाकती मूर्तिमंत'' ॥८५॥** (पुढे बाबा म्हणाले :- देवांना सांग,) **''त्वां मज नोळखिलें। कां मग बोलविल होतेंस ॥८६॥ लौकिकीं ना येथूनि हाललों। परी मी उद्यापनीं जेवूनि आलों। दोघांसमवेत येईन बोललों। तैसाच गेलों दोघांसवें ॥८७॥ होता जेवावया अवकाश। तेव्हांच आधीं एकटा सावकाश। तुज नाठवे का संन्यासवेष। प्रथम प्रवेश ये रीती ॥८८॥ पाहूनि आलों अकल्पित वृत्ती। पैसे मागेन तुज ही भीती।**





**वाटली नव्हती का तव चित्तीं। संशयनिवृत्ती म्यां केली।।८९।। येईन केवळ जेवावयास। सवें घेऊनियां दोघांस। ऐसें सांगूनियां वेळेस। नाहीं का दोघांसह जेवलों।।९०।। पहा मी माझिया वचनाकारणें। मरोनि जाईन जीवें प्राणें। परी माझिया मुखींचीं वचनें। अन्यथा होणें नाहीं कदा'' ।।९१।।**

बापूसाहेब जोगांनी देवांना हे सारे पत्राने कळविले. देवांनीं जैं पत्र वाचिलें। प्रेमोद्रेकें नेत्र ओथंबले। धिक् धिक् व्यर्थ साईंस दूषिलें। बहु हिरमुसले मनांत।।९४।।

**पार्श्वभूमी :**

मामलेदार देवांची ही कहाणी सांगत असता, खुद्द अण्णासाहेब दाभोलकरांना स्वत:ला आलेल्या अनुभवाची आठवण त्यांना झाली व ती त्यांनी या ४० व्या अध्यायात विशद केली; ती अशी :-

तो होळीच्या सणाचा दिवस होता. त्या पहाटे बाबा अण्णासाहेबांच्या स्वप्नात गेले व त्यांना म्हणाले :-

**''येतों मी आज भोजनास''**

हे स्वप्न त्यांनी त्यांच्या सौभाग्यवतींस सांगितले. त्यावर त्यांचा मुळीच विश्वास बसेना. तरीपण पतीच्या सांगण्यावरून त्यांनी थोडे जास्त जेवण तयार केले. बारा वाजता सर्वजण जेवणाच्या पानावर बसले. बाबांचे एक पान रांगोळी, पाट वगैरे लावून पूर्णपणे वाढून ठेवले व अण्णासाहेब अत्यंत आतुरतेने बाबा भोजनास यायची वाट पाहू लागले. त्यांच्या सौभाग्यवती म्हणाल्या, बाबा कशाला इतक्या दूर आपणाकडे जेवायला येतील ? ''मनी वसे ते स्वप्नी दिसे'', असा तुमचा बाबांच्याबाबतीत प्रकार झालेला दिसतो. बारा वाजून गेले; मंडळी पानांवर खोळंबली. अण्णासाहेब अधीर झाले. इतक्यात, जिन्याच्या पायऱ्या वाजल्या. अण्णासाहेबांनी घाईघाईने (बाबांच्या स्वागतासाठी) दार उघडले. पाहतात तो, एक अल्ली महंमद व दुसरे संत मौलानांचे शिष्य आले होते.

पाने वाढलेली पाहून अल्लीने विनंती केली, मी तुम्हाला भलत्यावेळी येऊन तसदी दिली; तरी क्षमा करा. ''ही आपली वस्तू घ्या !'' मी आपणास नंतर कधीतरी सावकाश भेटेन. अल्लीने दिलेले पुडके उघडल्यानंतर त्यात साईनाथांची सुंदर तस्वीर दिसली. अण्णासाहेबांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. यानंतर ते दोघे अण्णांचा निरोप घेऊन लागलीच परतले; कारण जेवणाच्या पंक्तीस त्यांच्यामुळे उशीर होऊ नये, ही त्यांची इच्छा होती. ती सुंदर साईंची तस्वीर पाहून सर्वांना खूप आनंद झाला. कारण, स्वप्नात सांगितल्याप्रमाणे, प्रत्यक्षात नाही; पण तस्वीरीच्या रूपात बाबा भेटायला आले होते.

या प्रसंगानंतर तब्बल नऊ वर्षांनी ते मुसलमान गृहस्थ अण्णासाहेबांना अगदी अचानकपणे रस्त्यात भेटले. अण्णांनी त्यांना 'त्याच दिवशी' ती बाबांची तस्वीर आणण्याचे प्रयोजन विचारले. ते म्हणाले, त्याची मोठी कहाणी आहे; ती तुम्हाला नंतर केव्हातरी सांगेन.

बाबांच्या अतर्क्य लीलांनी साईभक्त अचंबीत होतात. कल्पनातीत प्रकारांनी साई आपले देवत्व भक्तांना प्रदान करतात व त्यांच्यात भक्तिभावाचा उगम करून त्यांना सन्मार्गास लावतात. बाबांचे दर्शन, स्पर्शन व संभाषण हा एक अमौलिक अनुभव व अपूर्व आशीर्वाद होता. धन्य ते साईभक्त, ज्यांनी हे सारे प्रत्यक्ष'अनुभवले !

**।। अध्याय ४०वा समाप्त ।।**

**संस्थानचे स्नेहसंमेलन दिनांक २१ मार्च, २००२ रोजी पार पडल्यानंतर लागलीच वृत्तपत्र दै. 'गांवकरी'च्या दिनांक १ एप्रिलच्या अंकात प्रथम प्रकटलेला प्रत्यक्षदर्शी वस्तुनिष्ठ वृत्तांत**

# शिर्डी संस्थेमध्ये असं कधी घडलंच नव्हतं

शिर्डी (वार्ताहर) : साईबाबा संस्थानचे विश्वस्त व कर्मचाऱ्यांनी संस्थान परिसरात राबविलेले स्वच्छता अभियान, विश्वस्त, कर्मचारी व गांवकऱ्यांच्या एकत्रित क्रीडास्पर्धा व रंगोत्सव, सुकथनकरांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाने सर्वसामान्य कर्मचाऱ्यांबरोबर एकांकिकेत सहभाग घेऊन विषमता व कटुता दूर करण्यासाठी केलेला प्रामाणिक प्रयत्न, हे सारंच अतर्क्य, कौतुकास्पद. ज्यांनी हे अविस्मरणीय क्षण अनुभवले ते नक्कीच म्हणत असतील, असं कधी घडलंच नव्हतं.

या चाकोरीबाहेरच्या घटनेचं निमित्त होतं साईबाबा संस्थानचे विश्वस्त व कर्मचारी यांचे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन. धूलिवंदनाचं औचित्य साधून ठेवलेलं हे स्नेहसंमेलन हा दुग्धशर्करा योगच ठरला.

सकाळी संस्थानचे अध्यक्ष द. म. सुकथनकरांसह विश्वस्त व कर्मचाऱ्यांनी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून साईभक्तांना आश्चर्याचा धक्काच दिला. मंदिर व परिसरात स्वच्छता करण्याची संधी मिळावी, हे भाग्यवानांनाच साध्य होतं, अशी साईभक्तांची श्रद्धा आहे. त्यादृष्टीने बाबांनी विश्वस्तांवर टाकलेला विश्वास सार्थ ठरावा असंच हे वर्तन आहे.

त्यानंतर विश्वस्त, कर्मचारी व गांवकऱ्यांनी रंगांची मुक्त उधळण करीत जल्लोषात रंगोत्सव साजरा केला. मालक व नोकर ही नाती रंगांमध्ये सर्वांच्या नकळत केव्हाच विरघळून गेली होती. बेरंग आयुष्यात रंगोत्सवाचं महत्त्व हे आपपरभाव दूर करण्यासाठी किती महत्त्वाचं असतं याची प्रचिती यावेळी येत होती. या कार्यक्रमानंतर संस्थानच्या बगीचा विभागाने वृक्षदिंडीचे आयोजन केले होते. या वृक्षांचे नंतर साईनगरमध्ये समारंभपूर्वक रोपण करण्यात आले.

यानंतर विश्वस्त, कर्मचारी व गांवकऱ्यांच्या संयुक्त क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रिकेट, रस्सीखेच, स्लो सायकलींग, महिलांसाठी संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा, चमचा-लिंबू अशाप्रकारचे खेळ आयोजित करण्यात आले होते. नंतर साईप्रसादमध्ये स्नेहभोजनाचा कार्यक्रम झाला.

सायंकाळी विविध गुणदर्शनांत चुटकुले, नकला, गझल, कविता, गायन व वादन, जादूचे प्रयोग इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त प्रथमच विश्वस्त व कर्मचारी यांनी रमेश पवार लिखित तुफान विनोदी ''सायलेन्स खटला चालू हाय !'' ही एकांकिका बसविली होती. या एकांकिकेचं दिग्दर्शन केलं होतं कायदेतज्ज्ञ व संस्थानचे विश्वस्त मोहन जयकर यांनी. यात साईबाबा संस्थानचे अध्यक्ष द. म. सुकथनकर, विश्वस्त रमेश सोनी, पाहुणी कलाकार म्हणून प्रसिद्ध सिनेतारका स्मिता जयकर, डॉ. पितांबरे, धनंजय मराठे, किशोर गागरे, गणपत तात्या गोंदकर यांच्यासह कृष्णाच्या मध्यवर्ती भूमिकेत काम करणाऱ्या मोहन जयकरांसह सर्व कलाकारांनी प्रेक्षकांची दाद मिळविली. एकांकिकेचे नेपथ्य अंकुश कांबळी, मुंबई व रंगभूषा, वेषभूषा विलास कुडाळकर, मुंबई यांनी केले होते. मोठेपणाचे, पदाचे मुखवटे काही क्षण का होईना प्रामाणिकपणे दूर केले तर प्रत्येक लपलेल्या मूळ सुंदर स्वरूपाचं (सद्गुणाचं), माणुसकीचं दर्शन होतं याचं यावेळी प्रत्यंतर आलं. सुकथनकरांसारख्या राज्याच्या मुख्य सचिवपदी राहिलेल्या ज्येष्ठ व्यक्तीने या एकांकिकेच्या व खेळीमेळीच्या माध्यमातून साधलेला समन्वय हा खरोखरच स्तुत्य व अनुकरणीय आहे.

रात्री उशिरा आरतीनंतर येथील नाट्यरसिक संघाने किशोर गागरे लिखित व विश्वस्त शांताराम मिराणे दिग्दर्शित ''असं कधी घडलंच नव्हतं !'' हे धमाल विनोदी मुक्तनाट्य सादर केलं. यात विश्वस्त शांताराम मिराणे, गणपत तात्या गोंदकर, अशोक गोंदकर, प्रल्हाद वाणी, अशोक नागरे, रामदास बरदे, किशोर गागरे, राजेंद्र अलोट, श्रीमती रजनी जोगळेकर, कु. ज्योती सातारकर, कु. अपर्णा बरदे यांनी भूमिका केल्या. गणपत गोंदकरांची लेखन संकल्पना असलेल्या लावणीप्रधान नाट्याला गणेश जेकबाने, नवेन्दु मराठे, ज्ञानेश कुलकर्णी यांनी संगीत दिलं व प्रकाश गायके, सुभाष घुगे व संजय देदरकरांनी सहाय्य केलं.

संस्थानचे विश्वस्त व शिर्डीचे नगराध्यक्ष कैलास बापू कोते यांच्या प्रयत्नातूनच विश्वस्त, कर्मचारी व गांवकऱ्यांमधील दुरावा कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांनी गांवकऱ्यांच्या वतीने द. म. सुकथनकर यांचा बाबुराव पुरोहितांच्या हस्ते सत्कार केला. या सर्व कार्यक्रमामध्ये विश्वस्त मोहन जयकर, सोनी, केंगे, राजीव रोहोम, पटेल, वागस्कर, बोरावके, पवार, दंडवते, सौ. क्षिरसागर, शांताराम मिराणे, शामसुंदर शहाणे, डुबे पाटील आणि कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब वाकचौरे, प्रशासकीय अधिकारी सुभाष जगताप, जोशी आदिंनी विशेष सहभाग घेतला.

**क्षणचित्रे :**

या कार्यक्रमामध्ये कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब वाकचौरे यांनी साईबाबांवर रचलेली साईंची सावली ही अर्थपूर्ण कविता स्वतः म्हणून दाखवून दाद मिळविली व हम भी किसीसे कम नहीं है सिद्ध केलं.

''सायलेन्स खटला चालू हाय !'' या एकांकिकेसाठी कोर्टाचा देखावा उभा करण्यात आला होता व तेथे फलक लावण्यात आला होता की ''शहाण्यांनी कोर्टाची पायरी चढू नये.'' यामुळेच की काय जणू संस्थानचे विश्वस्त व जनसंपर्क अधिकारी शामसुंदर शहाणे स्टेजपासून दूरच दिसत होते.

बगीचा विभागाने आयोजित केलेल्या वृक्षदिंडीचे महत्त्व लक्षात घेता बक्षीस वितरणात त्यांचा अनवधानाने विसर पडला.

संस्थानकडून कर्मचाऱ्यांना भेटवस्तू म्हणून स्टेनलेस स्टीलचे डबे पुरणपोळीसह भेट देण्यात आले. पोळ्या गार होऊ नयेत म्हणून काहींनी वेळात वेळ काढून डबे घरी रवाना केले.

अगदी खेळीमेळीच्या व निखळ आनंदाच्या वातावरणात संपन्न झालेल्या श्री साईबाबा संस्थानच्या विश्वस्त व अधिकारी-कर्मचारी यांच्या कौटुंबिक स्वरूपाच्या स्नेहसंमेलनात सादर झालेल्या ''सायलेन्स खटला चालू हाय !'' या एकांकिकेचे निमित्त करून काही नित्याच्या असंतुष्ट व विघ्नसंतोषी व्यक्तींनी शिरडी व शिरडी परिसरातील ग्रामस्थांना आणि साईभक्तांना भडकविण्याचा व त्याद्वारे शिरडीतील शांतता व सुव्यवस्था आणि संस्थानच्या अलिकडच्या कामांमुळे साईभक्तांमध्ये संस्थानबद्दल निर्माण झालेला उत्स्फूर्त प्रशंसात्मक भाव बिघडविण्याचा कसोशीने आटोकाट नाठाळ प्रयत्न केला. परंतु, या अपप्रचाराचा धूर्त कावा वेळीच ओळखून समस्त ग्रामस्थांनी व तमाम साईभक्तांनी आपले चित्त अजिबात विचलित होऊ न देता आपल्या संयमी व विवेकशील सुजाण साईभक्तीचे दर्शन घडविले. त्याबद्दल साऱ्या ग्रामस्थांचे व साईभक्तांचे संस्थान अत्यंत आभारी आहे. स्नेहसंमेलनात नेमके काय घडले, हे जाणून घेण्यास साईभक्त उत्सुक असल्याने, यासंबंधात संस्थानने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व शासनातील इतर मान्यवरांना सादर केलेली दोन निवेदने येथे प्रसिद्ध केली आहेत.

## ''सायलेन्स खटला चालू हाय !''चा प्रयोग सादर करण्यामागचा उद्देश

# स्थानिक परंपरेशी सुसंगत अशा रीतीने विनोदनिर्मिती आणि अंतिमत: बोध करणे हा होता !

मुंबई
दिनांक : २७ मे, २००२

प्रति,

विषय :- दिनांक २९ मार्च, २००२ रोजी संस्थानचे विश्वस्त व अधिकारी - कर्मचारी यांच्या शिरडी येथे झालेल्या स्नेहसंमेलनात सादर करण्यात आलेल्या ''सायलेन्स खटला चालू हाय !'' या एकांकिकेच्या प्रयोगाबाबत मागाहून पंधरवड्यानंतर पश्चात् बुद्धीने करण्यात आलेली विपर्यस्त टीका

महोदय,

दिनांक २९ मार्च, २००२ रोजी, **होळी सणानंतर लगोलग येणाऱ्या धुळवडीच्या दिवशी,** श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विश्वस्त व अधिकारी - कर्मचारी यांचे स्नेहसंमेलन यशस्वीपणे पार पडले. हा नवा उपक्रम संस्थानच्या इतिहासात यावर्षी प्रथमच संपन्न झाला. मोठा-लहान, विश्वस्त - अधिकारी - कर्मचारी, असा भेदभाव बाजूला सारून सर्वांनी या स्नेहसंमेलनातील विविध क्रीडा-स्पर्धा, संगीत, लोकनाट्य व इतर कलाप्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांत मनमोकळेपणाने व हिरीरीने भाग घेतला. या उपक्रमाद्वारे शिरडी संस्थानचे विश्वस्त व अधिकारी - कर्मचारी आणि शिरडी येथील ग्रामस्थ यांच्यात परस्पर सद्भावना, स्नेह व सौहार्द वृद्धिंगत होण्यास बहुमोल मदत झाली. मोठ्या संख्येने उपस्थित राहून व प्रसंगी सहभागीदेखील होऊन, समस्त शिरडीवासीयांनी या अभिनव उपक्रमाचे स्वागत व कौतुक केले. एवढेच नव्हे तर, यापुढेही प्रतिवर्षी असे स्नेहसंमेलन परस्पर जवळीक दृढ करण्याच्या दृष्टीने भरविण्यात यावे, अशी सर्वसाधारण प्रतिक्रियादेखील सार्वत्रिकपणे व्यक्त केली गेली.

२. या उपक्रमाचे सर्वांकडून तोंडभरून कौतुक होत असतानाच, **तब्बल १५ दिवसांचा कालावधी उलटून गेल्यानंतर, दिनांक १५ एप्रिल, २००२ रोजी** अहमदनगर येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'लोकसत्ता' या दैनिकात एकाएकी **'अनेक साईभक्त, शिरडी' या (कोणाचेही नाव नसलेल्या) सर्वनामाने प्रसिद्ध झालेल्या एका पत्रात** उपरोक्त स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातील वर उल्लेखिलेल्या एकांकिकेद्वारे ''राधाकृष्णाच्या प्रेमकथेला विडंबनात्मक स्वरूपात दाखवून असंख्य साईभक्तांच्या भावना पायदळी तुडविण्यात आल्या''; त्यातील ''पात्रे न्यायालयाचा अवमान होईल अशाप्रकारे

वावरत होती'', आदि निराधार व विपर्यस्त आरोप जाणूनबुजून करण्यात आलेले होते. (त्यानंतर मात्र ज्या घटना एकामागून एक क्रमशः घडल्या त्या विचारात घेतां, हे खोडसाळ पत्र हेतुपुरस्सर व पूर्वनियोजित पद्धतीने, **संस्थानचेच कोपरगांव येथे राहणारे एक विश्वस्त डॉ. अजेय गर्जे** यांनी वा त्यांच्याच प्रेरणेने प्रसिद्ध झाल्याचे कोणासही सहज उमजून येईल). वर उल्लेखित पत्र प्रसिद्ध झाल्यानंतर, त्याचे सोयीस्करपणे सूत्र पकडून, लगेच दिनांक १७ एप्रिल, २००२ रोजी सदर डॉ. गर्जे यांनी, जणू आपण एकटेच फार उच्च अभिरुची असलेले व संस्थानच्या नीतिमत्तेचे एकमेव रखवालदार आहोत असा आव आणून, **''स्नेहसंमेलनात सादर करण्यात आलेल्या एकांकिकेतील श्रीकृष्णाचे पात्र व इतर प्रसंगांविषयी माझा प्रत्यक्ष कोणताही संबंध नाही'', असा अनाहूत खुलासा करणारे व ''झालेल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त करणारे'' जाहीर पत्रक काढले ! त्याला स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिद्धी मिळण्याची सर्व तजवीजही त्यांनी केली.** त्याचप्रमाणे आपल्या मुरलेल्या स्वभावधर्मानुसार डॉ. गर्जे यांनी संस्थानचे अध्यक्ष व इतर बहुसंख्य विश्वस्त यांच्यावरही निष्कारण चिखलफेक केली.

३. त्यानंतर शिरडी येथे लगोलग झालेल्या रामनवमी उत्सवापूर्वी व उत्सवाच्या ऐन कालावधीत (दिनांक २० ते २२ एप्रिल, २००२), **सदर एकांकिकेचा प्रयोग होऊन तब्बल तीन आठवडे उलटून गेल्यानंतर, एकाएकी या प्रयोगासंबंधी व त्यांत विविध भूमिका पार पाडणाऱ्या संस्थानचे अध्यक्ष व इतर विश्वस्तांवर गलिच्छ आरोप करणाऱ्या बातम्या पद्धतशीरपणे व पूर्वनियोजितपणे प्रसिद्ध करण्यात आल्या.** एवढेच नव्हे तर, साईभक्तांच्या धार्मिक भावना दुखावण्यात आल्याचा अत्यंत हीन स्वरूपाचा खोटारडा आरोप करून, समाजातील घटकांत दुही व वैमनस्य निर्माण होईल व त्याचे संघर्षात, किंबहुना हिंसाचारात, पर्यवसान होईल अशा प्रकारच्या भडकवणाऱ्या मजकुरासही मुबलक प्रसिद्धी जाणूनबुजून देण्यात आली. या मजकुरास उद्देशून, **संस्थानचे कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २१ एप्रिल, २००२ रोजी शिरडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना एक पत्र लिहून त्यांचे लक्ष उपरोक्त प्रक्षोभक व धार्मिक चिथावणी देऊन सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या मजकुराकडे त्यांचे लक्ष वेधले** आणि या गंभीर गैरकृत्यांची व गुन्ह्यांची तत्काळ दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही लगोलग करण्याची त्यांना विनंती केली. तदनंतरही, पराचा कावळा करणाऱ्या आणि संस्थानचे अध्यक्ष व बहुसंख्य विश्वस्त यांचा मत्सर करणाऱ्या आणि विशिष्ट बद्हेतू मनात सतत बाळगणाऱ्या व्यक्तींनी या एकांकिकेच्या प्रयोगाबद्दल मुद्दाम गैरसमज पसरविणाऱ्या व चिखलफेक करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध करण्याचा पूर्वनियोजित असा खटाटोप पुढेही आजतागायत जाणूनबुजून चालू ठेवला असल्याचें दिसून येतें.

४. सदर एकांकिकेच्या प्रयोगाबाबत व्यक्त करण्यात आलेले आक्षेप (जे खाली दिलेल्या सविस्तर स्पष्टीकरणावरून अतिरंजित, निराधार व मुद्दाम गैरसमज पसरवून संस्थान आणि या एकांकिकेच्या प्रयोगात भाग घेतलेले संस्थानचे अध्यक्ष व काही विश्वस्त यांची जाणूनबुजून बदनामी करण्याच्याच एकमेव उद्देशाने करण्यात आले आहेत, हें आपणासही स्पष्ट होईल) थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

अ) या प्रयोगाद्वारे हिंदू देवदेवतांचा अपमान करण्यात आला आणि धार्मिक भावना दुखावण्यात आल्या.

ब) साईमंदिराच्या पवित्र परिसरात द्व्यर्थी संवाद व तथाकथित अश्लिल हावभाव यांद्वारे राधाकृष्णाच्या प्रेमाचे तथाकथित विडंबन करण्यात आले.

क) सदर एकांकिकेतील पात्रे न्यायालयाचा अवमान होईल अशा प्रकारे वावरत होती.

ड) संस्थानचे अध्यक्ष व अभिनेत्री सौ. स्मिता जयकर यांनी एकांकिकेच्या या प्रयोगात रंगमंचावर नाच-फुगडी घातली, जें अयोग्य होतें.

ई) संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्तांनी अशा प्रकारच्या एकांकिकेत भाग घेऊन अनुचित वर्तन केले.

५. वरील सर्व आरोप बऱ्याच दिवसांनंतर, केवळ पश्चात् बुद्धीने व विशिष्ट बद्हेतूने मुद्दाम ओढून-ताणून व अतिरंजितपणे केलेले असून ते कसे अस्थानी व निराधार आहेत हें खाली दिलेल्या सविस्तर स्पष्टीकरणावर वस्तुनिष्ठपणे

विचार करतां कुणासही सहज उमजून येईल.

अ) श्री साईबाबा संस्थानतर्फे साजरा करण्यात येणारा श्री रामनवमीचा उत्सव स्वत: श्री साईबाबांच्या प्रेरणेने व त्यांच्या हयातीतच शिरडी येथे सुरु झालेला उत्सव आहे. या उत्सवाची जबाबदारी नंतर ह. भ. प. दासगणू महाराज यांनी अनेक वर्षे सांभाळली. श्री साईबाबांच्या आशीर्वादाने अध्यात्माकडे वळण्यापूर्वी दासगणू महाराजांचा कल तमाशाकडे होता व त्यामुळेच की काय, असंख्य कीर्तनें, आख्यानें व पदें रचताना अभंग, दिंडी, साकी यांसारख्या काव्यप्रकाराबरोबरच लावणी हा कलाप्रकार त्यांनी कीर्तनांतून जोपासला आणि त्यांद्वारे अध्यात्म-परमार्थ साईभक्तांना समजावला. श्री साईबाबा हे कलाकारांचा आदर करीत, त्यांची कला मन लावून पहात व ऐकत आणि त्यांना रुपया व नारळ देऊन त्यांचा सन्मान करीत. त्याचबरोबर बाबा स्वत: पायांत घुंगरू घालून नाचत असा उल्लेखही श्री साईसच्चरितात आहे. ही परंपरा आजतागायत संस्थानने चालू ठेवली आहे. शिरडी येथे हजेरी लावलेले महाराष्ट्रातील ख्यातनाम लोककलाकार राम नगरकर, भाऊ - बापू, दत्ता महाडिक अशी अनेक नावे यासंदर्भात सांगता येतील. अशा पध्दतीने तमाशात सादर करण्यात येणारे गण, गौळण, वग हे ग्रामीण कलाप्रकार वेळेच्या उपलब्धतेनुसार साईमंदिरासमोर वा परिसरातच विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठितांच्या उपस्थितीत सादर करण्यात येतात व त्याद्वारे तमाशाचा बाज सांभाळून देवाची सेवा करण्याची परंपरा कलावंत सांभाळतात. शिरडीतील 'नाट्य रसिक संचा'ने अशा प्रकारचे वगनाट्य शिरडीत अनेकदा सादर केलेले असून दर कोजागिरी पौर्णिमेस एक वगनाट्य हमखास सादर केले जाते. अशा प्रकारच्या वगनाट्यात प्राप्त परिस्थितीनुरूप ऐन वेळी सुचलेला संवाद तत्काळ फेकण्याची वा कृती करण्याची संधी कलाकारांना असते व प्रयोगाच्या रंगसंगतीसाठी त्या संधीचा फायदा कलाकार घेत असतात. अशी ही परंपरा असलेल्या ठिकाणी, एकादे वगनाट्य संस्थान विश्वस्त व अधिकारी - कर्मचारी यांनी आपल्या कौटुंबिक स्नेहसंमेलनातील कार्यक्रम म्हणून मंदिराच्या बाजूकडील खुल्या जागेत करण्यात व त्यांत अध्यक्ष, विश्वस्त व अधिकारी - कर्मचारी यांनी एकत्रितपणे सहभागी होण्यात त्यांनी घोडचूक केली वा अश्लिलपणा केला, असा आरोप करणे, वस्तुनिष्ठपणे विचार करतां, संयुक्तिक म्हणता येईल काय ? वगनाट्याचा मूळ उद्देशच विनोद-निर्मिती करून वातावरण खेळी-मेळीचे करणे व अंतिमत: प्रबोधन करणे हा असल्यामुळे त्या नाट्यातील पात्रांना विनोदी ढंगात सादर केले जाते. हा वगनाट्याचा मूळ उद्देश व सदरची एकांकिका सादर करण्यामागची संस्थानची साईबाबांसमोर लोककला सादर करण्याची परंपरा लक्षात घेऊन खेळी-मेळीचे वातावरण तयार करण्याची भूमिका, याकडे आरोपकर्त्यांनी हेतुत: सोयीस्करपणे मुळातच दुर्लक्ष केले आहे, हे यावरून अगदी सुस्पष्ट होते.

ब) विशेष म्हणजे, सादर केलेली श्री. रमेश पवार लिखित सदर एकांकिका, "सायलेन्स खटला चालू हाय !" ही अनेक वर्षांपूर्वी, ऑक्टोबर, १९७४ मध्ये, प्रथम प्रसिध्द झाली आणि त्यानंतर आजतागायत तिचे विविध ठिकाणी शेकडो प्रयोग यशस्वीपणे व प्रेक्षक-श्रोत्यांची भरपूर दाद मिळून पार पडलेले आहेत. त्यातील भाषा ग्रामीण स्वरूपाची व हास्य-विनोदाची झालर असलेली असून त्याद्वारे श्रीकृष्णाचे वा न्यायदेवतेचे विडंबन वा अवहेलना झाल्याची टीका आजतागायत कुठेही, कधीही व कोणीही केलेली नाही. करमणूक व प्रहसन यांवर भर असलेल्या या विनोदी एकांकिकेचा भावार्थ व उद्देश सार्वजनिक प्रबोधन, हाच आहे, हें विशेषेंकरून या एकांकिकेतील उत्तरार्धाच्या भागातून सुस्पष्टच होते. आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे, डिसेंबर, १९७४ मध्ये मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात याच एकांकिकेचा प्रयोग माननीय न्यायमूर्ती व इतर प्रतिष्ठितांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पडला होता. वरील सर्व पार्श्वभूमी ध्यानात घेतां संस्थानच्या कौटुंबिक स्नेहसंमेलनात सदर एकांकिकेचा प्रयोग सादर केल्यास काही विपरीत टीका केली जाईल, असे कुणासही वाटणे कदापिही शक्य नव्हते.

क) श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या स्नेहसंमेलनात सदर एकांकिकेचा प्रयोग दिनांक २९ मार्च, २००२ रोजी पार पडला व त्यास सुरुवातीपासून शेवटपर्यंत उपस्थित सुमारे तीन हजार साईभक्त, शिरडी ग्रामस्थ आदींचा उत्स्फूर्त, कौतुकास्पद व प्रशंसात्मक जाहीर प्रतिसाद मिळाला. या प्रयोगानंतर लगोलग वा दोन आठवडे उलटून जाईपर्यंत, कोणतीही विपरीत प्रतिक्रिया, एकाद्या पत्राद्वारें वा समक्ष, कोणीही कुठेही प्रगट

केली नाही. एकाद्या वर्तमानपत्रातूनही अशी टीकात्मक प्रतिक्रिया एका शब्दानेही उमटली नाही.

ड) सुमारे दोन आठवडे उलटून गेल्यानंतर मात्र, वर म्हटल्याप्रमाणे, जाणूनबुजून दिशाभूल करणारे एक पत्र 'अनेक साईभक्त' या (कोणाचेही नाव नसलेल्या) सर्वनामाने प्रथम प्रसिद्ध करण्यात आले. पुढे घडलेल्या विपरीत प्रदीर्घ प्रसिद्धी कटाची ही जणू नांदीच होती असें, त्यानंतर नियोजित पद्धतीने घडवून आणण्यात आलेल्या विविध घटना व सततच्या विपरीत प्रसिद्धीवरून, स्पष्टपणे दिसून येते.

ई) श्री रामनवमीच्या उत्सवाच्या वेळी अनायासे मोठ्या संख्येने शिरडी येथे जमलेल्या साईभक्तांना एकांकिकेच्या प्रकरणावरून भडकावून देऊन संस्थानचे अध्यक्ष व बहुसंख्य विश्वस्त यांची जाणूनबुजून बदनामी व्हावी, हाच या एकूण दुर्दैवी व गलिच्छ प्रकाराचा एकमेव हेतू होता. परंतु, त्याला उपस्थित साईभक्तांनी अजिबात प्रतिसाद न दिल्याने तो हेतू मुळीच साध्य झाला नाही.

फ) संस्थानचे अध्यक्ष यांनी सुप्रसिध्द नाट्य व सिने अभिनेत्री सौ. स्मिता जयकर (ज्यांनी राधेची भूमिका केली) यांच्याबरोबर रंगमंचावर फुगडी घातली याला मुद्दाम विपर्यस्त प्रसिध्दी देण्यात आली आहे. वास्तविक, या एकांकिकेत भाग घेणाऱ्या सर्व पात्रांनी खटल्यातील आरोपी श्रीकृष्णाला निर्दोष ठरवून मुक्त केल्याबद्दल आनंद व्यक्त करताना नाच-फुगडी घालण्याचा असा एक प्रसंग सदर एकांकिकेतच अगदीं अखेरीस आहे. संस्थानचे एक विश्वस्त, श्री. मोहन जयकर (ज्यांनी श्रीकृष्णाची भूमिका केली) यांच्या सौ. स्मिता जयकर या पत्नी असून त्या निस्सीम साईभक्त आहेत. त्यांनी पाहुण्या कलाकार म्हणून संस्थान स्नेहसंमेलनांतर्गत सादर झालेल्या या एकांकिकेत भाग घेतला होता, हें विशेष. संस्थानच्या अध्यक्षांच्या पत्नीदेखील त्यावेळी प्रेक्षकांमध्ये समोरच बसल्या होत्या. हे सर्व लक्षात घेतां, हा नाच-फुगडीचा प्रकार विपरीत वा हिडीस होता, अशी टीका करणे निखालस चुकीचे व अप्रस्तुत आहे, असेंच म्हणावे लागेल. किंबहुना, अशी टीका होणे हें वेगळ्या विशिष्ट दृष्टीचे वा मनोवृत्तीचें द्योतक आहे, असें म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

ग) हा सर्व कुप्रसिद्धीचा कट, यापूर्वीही अनेकदा अशाच प्रकारें संस्थानचे अध्यक्ष व इतर विश्वस्त यांच्यावर खोटेनाटे आरोप करण्यात निर्ढावलेले संस्थानचेच एक विश्वस्त डॉ. अजेय गर्जे यांच्या एकमेव प्रेरणेने नंतर रचण्यात आला. पंधरवड्यानंतर विलंबाने व पूर्वनियोजित पद्धतीने या प्रयोगाची बाब मुद्दाम उकरून काढून, संस्थानचे अध्यक्ष व इतर काही विश्वस्तांना जाणूनबुजून अडचणीत आणण्यासाठी, विघ्नसंतोषी वृत्तीच्या इतर स्थानिक दोन-चार व्यक्तींना हाताशी धरून वृत्तपत्राच्या आणि इतर माध्यमांतून या बाबीस भडकपणे व आम जनतेची मने कलुषित व्हावी अशा रीतीने अवास्तव कुप्रसिद्धी देण्यात त्यांनीच पुढाकार घेतला, हे या एकूण प्रकारावरून स्पष्टपणे दिसून येते. संस्थानचेच एक विश्वस्त असलेल्या डॉ. गर्जे यांनी या प्रयोगाचे राजकारण करावे, या प्रयोगाची टेप विशिष्ट पद्धतीने प्रसारित करून संस्थान व विद्यमान विश्वस्त मंडळाची निराधारपणे बदनामी करण्याची हीन कृती करावी, हा खरोखर एक दैवदुर्विलास आहे. दिनांक १३ मे, २००२ रोजी मुंबई येथे झालेल्या विश्वस्त मंडळांच्या विशेष बैठकीत डॉ. गर्जे यांच्या या कृतीचा तीव्र शब्दांत निषेध करणारा ठराव (एक उपस्थित विश्वस्त श्री. वागस्कर यांचा एकमेव अपवाद वगळता) प्रचंड बहुमताने संमत करण्यात आला.

६. उपरोक्त खुलाश्यावरून एकांकिकेच्या या प्रयोगाला मागाहून विलंबाने व विशिष्ट हेतू मनात ठेवून देण्यात आलेली विस्तृत कुप्रसिद्धी आणि त्यासंबंधात करण्यात आलेले अद्वातद्वा निरनिराळे आरोप हे पूर्णपणे निराधार कसे आहेत याची आपणासही सहज कल्पना येईल. केवळ संस्थान आणि संस्थानचे अध्यक्ष व काही विश्वस्त यांची बुद्धिपुरस्सर बदनामी करण्यासाठी पूर्वनियोजित पद्धतीने रचण्यात आलेले हे सर्व एक मोठे कुभांडच होतें. याबाबत केल्या गेलेल्या तक्रारींसंबंधात पुढील कोणतीही कार्यवाही संस्थान वा संबंधितांवर करण्यापूर्वी वरील सविस्तर वस्तुस्थितीदर्शक स्पष्टीकरणावर गंभीरपणे विचार करून हे सर्व निराधार तक्रारी-वजा-आरोप सपशेल फेटाळून लावण्याचा न्यायोचित निर्णय आपण घ्याल, असा आम्हास विश्वास वाटतो. -

# निराधार तक्रारींबाबत संस्थानने सादर केलेल्या सविस्तर निवेदनांची कालबद्ध पद्धतीने पडताळणी करण्याचा संस्थानचा आग्रह

मुंबई
दिनांक : २७ मे, २००२

प्रति,

**विषय :- संस्थानचे विद्यमान विश्वस्त मंडळ सप्टेंबर, १९९९ मध्ये अधिकारारूढ झाल्यापासून त्याच्या कारभाराबाबत वेळोवेळी करण्यात आलेल्या निराधार आरोपांचे खंडन करणारीं संस्थानने सादर केलेली सविस्तर निवेदने कालबद्ध पद्धतीने तपासून ही चौकशी-वजा-पडताळणी सत्वर पूर्ण करण्याची आग्रहपूर्वक विनंती.**

महोदय,

मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांनी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन योजनेतील संबंधित तरतुदीअन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार संस्थानच्या विद्यमान व्यवस्थापन मंडळाची १ सप्टेंबर, १९९९ पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्याचे आदेश काढल्यानंतर सध्याचे व्यवस्थापन मंडळ दिनांक १ सप्टेंबर, १९९९ पासून कार्यरत आहे. या मंडळाचे आजमितीस एकूण (अध्यक्षांसह) २१ सदस्य आहेत. त्यांपैकी स्वत: अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर आणि पाच सदस्य (सर्वश्री मोहन जयकर, रमेश सोनी, प्रकाश वैशंपायन, भास्कर बोरावके आणि राजीव रोहोम) हे तत्पूर्वीच्या व्यवस्थापन मंडळाचे (१ सप्टेंबर, १९९४ ते ३१ ऑगस्ट, १९९९) देखील सदस्य होते आणि त्यांची विद्यमान व्यवस्थापन मंडळावर पुनर्नियुक्ती झालेली आहे.

२. हें पत्र आपणास लिहून मुद्दाम तसदी देण्याचे कारण असे कीं, विद्यमान व्यवस्थापन मंडळाने अधिकारारूढ झाल्यापासून गेल्या सुमारे अडीच वर्षांहून अधिक झालेल्या कालखंडात संस्थानचा कारभार संस्थानच्या विहित ध्येयें व उद्दिष्टांशी एकनिष्ठ राहून आणि संस्थानच्या व्यवस्थापन योजनेतील संबंधित विविध तरतुदींचे काटेकोरपणे पालन करून, कार्यक्षमपणे पारदर्शकरीत्या व भक्ताभिमुखपणे चालविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे आणि यापुढेही तो तशाच प्रकारे चालविण्याचा मंडळाचा निर्धार आहे, हें आम्ही आपणास अत्यंत जबाबदारीने व नम्रपणे सांगू इच्छितो. असें असतानाही, दुर्दैवाने, **विद्यमान व्यवस्थापन मंडळाची नियुक्ती झाल्यापासून, विशेषेंकरून शिरडी व शिरडी परिसरातील काही व्यक्ती, ज्यांची व्यवस्थापन मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती होण्याची आत्यंतिक इच्छा होती परंतु त्यांची तशी नियुक्ती मा. धर्मादाय आयुक्त यांच्याकडून केली गेली नाही यांनी, संस्थानच्या कारभाराबाबत काल्पनिक, अव्वाचे सव्वा व सपशेल निराधार आरोप करणारी निवेदने** भारताचे मा. पंतप्रधान व इतर मा. मंत्री, तसेच महाराष्ट्राचे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. विधी व न्याय मंत्री, इतर विभागांचे मा. मंत्री, मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य आदि **महत्त्वाच्या व्यक्तींकडे वेळोवेळी पाठविण्याचा जणू नित्यक्रम सुरुवातीपासूनच अद्यापपर्यंत चालू ठेवला आहे,** असे दुर्दैवाने म्हणावे लागतें. अशा काही प्रमुख तक्रार-वजा-निवेदनांचा तपशील व त्यांबाबत संस्थानकडून मा. धर्मादाय आयुक्त यांना सादर करण्यात आलेल्या खुलाश्यांचा संक्षिप्तपणे उल्लेख पुढील परिच्छेदात करीत आहोत.

३. अ) अशा प्रकारचे **पहिलें तक्रार-वजा-निवेदन 'शिरडी साईभक्त मंडळ, शिरडी' असे नामाभिधान असलेल्या कांहीं शिरडीस्थित मतलबी व्यक्तींनी स्थापन केलेल्या संस्थेकडून नोव्हेंबर, १९९९ मध्ये महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. विधी व न्याय मंत्री, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर आदि महत्त्वाच्या व्यक्तींना पाठविले होते.** याच निवेदनाचें इंग्रजी भाषांतर करून तें (इंग्रजी भाषेतील) निवेदन डिसेंबर, १९९९ मध्ये मा. गृहमंत्री, केंद्र

शासन, यांनाही त्यांनी पाठविले होते. यथावकाश या सर्व निवेदनांच्या प्रती मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडून त्यांतील तक्रार-आरोपांचे स्पष्टीकरण-तथा-खुलासा संबंधित कागदपत्रांसह सादर करण्याकरिता संस्थानकडे बऱ्याच विलंबाने प्राप्त झाल्या. या निवेदनाद्वारे मुख्यत्वे (१) साईबाबा मंदिराचा पुनर्विकास, पुरातन वारसा इमारतींचे सुदृढीकरण, स्टाफ क्वार्टर्स, ब्लड बँक इमारत आदि नवीन बांधकामे व अस्तित्वातील बांधकामांची दुरुस्ती, (२) विविध प्रकारची उपकरणे व साधनसामुग्री, प्रसादालयासाठी धान्य व किराणा माल, साईनाथ रुग्णालयासाठी औषधे आदि वस्तू व मालाची खरेदी, (३) संस्थानच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक, यांसारख्या संस्थानच्या कारभारातील विविध नित्याच्या व्यवहारांत तथाकथित भ्रष्टाचाराचे वारेमाप, साफ बिनबुडाचे व अत्यंत गलिच्छ असे आरोप करण्यात आलेले होते. या निवेदनात वापरण्यात आलेली भाषा व शब्दरचना आणि प्रथमदर्शनीच कृत्रिम व काल्पनिक वाटतील अशा रकमांच्या आंकडेवारीचा उल्लेख आदि पाहतां, या निवेदनातील पूर्वग्रहदूषितपणे व आकसाने केलेले असे आरोप खोटारडे, निराधार व केवळ छळणूक करण्याच्या हेतूनेच केलेले आहेत, असें ते वाचणाऱ्या कोणाही सूज्ञ व्यक्तीस सहजगत्या जाणवेल. तरीही, या निवेदनांच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर त्यांतील एकूण एक आरोप व तक्रारींचे निराकरण व खंडन करणारे अत्यंत विस्तृत व सविस्तर असें स्पष्टीकरण (सर्व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतींसह) मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे संस्थानच्या (जा. क्र. एस्एस्एस्-वशी-अध्यक्ष-६७९०-२०००) दिनांक २७.११.२००० च्या पत्रान्वयें सादर करण्यात आलेलें आहे.

ब) तद्नंतर शिरडी येथील काही रहिवाशी (डॉ. इ. बी. गोंदकर, श्री. तुकाराम गोंदकर, डॉ. एम. वाय. देशमुख, श्री. राजेंद्र पिपाडा, श्री. अरुणकुमार दोडीया व श्री. दिलीप संकलेचा) यांनी एक लांबलचक तक्रार-वजा-निवेदन मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे दिनांक १२ जून, २००१ रोजी पाठवून "श्री. द. म. सुकथनकर, अध्यक्ष, विश्वस्त मंडळ, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या गैरकारभाराची चौकशी करणेबाबत....." विनंती केली होती. या निवेदनाची प्रत मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडून जा. क्र. विधी/किरकोळ/२९-२००१/१-२००१/४३८२/२००१, दिनांक १९ जुलै, २००१ या पत्रान्वये सदर निवेदनातील आरोपांबाबत स्पष्टीकरण व खुलासा सादर करण्यासाठी संस्थानकडे प्राप्त झाली. आश्चर्याची बाब अशी कीं, डॉ. इ. बी. गोंदकर व इतर पाच तक्रारदार यांच्या सदर निवेदनातील तक्रारींचे मुद्दे व त्या तक्रारींचा मजकूर हा वरील उपपरिच्छेद (अ) मध्यें उल्लेखिलेल्या तथाकथित 'शिरडी साईभक्त मंडळ, शिरडी' यांनी नोव्हेंबर, १९९९ मध्ये पाठविलेल्या निवेदनातील मजकुराशी अगदी (बऱ्याच अंशी शब्दशःदेखील) मिळता-जुळता असाच होता ! डॉ. गोंदकर आदिंच्या तक्रार-वजा-निवेदनास उद्देशून संस्थानच्या दिनांक ११ ऑगस्ट, २००१ रोजीच्या पत्रान्वये (जा. क्र. एस्एस्एस्-वशी-अध्यक्ष-३०४८-२००१) मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांना स्पष्टीकरण-वजा-उत्तर पाठविण्यात आलेलें आहे. जरी पुनरावृत्ती होत असली तरी, या उत्तरातील दोन परिच्छेद अर्थपूर्ण असल्यामुळे ते खालीं मुद्दाम उद्धृत करीत आहोत.

> "हें व्यवस्थापन मंडळ अधिकारारूढ झाल्यापासून व्यवस्थापन मंडळाविरुद्ध सतत खोडसाळ तक्रारी करणारे विघ्नसंतोषी ठराविक लोकच आहेत. जंग जंग पछाडले तरीही या क्षुद्र राजकारण्यांची संस्थानच्या व्यवस्थापन मंडळात विश्वस्त म्हणून वर्णी न लागल्याने, वैफल्यग्रस्त भावनेतून, कधीं जाहीर पत्रके काढून वर्तमान-पत्राद्वारे, तर कधी निवेदनाद्वारे खोट्या तक्रारी आपणाकडे, तसेंच महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री व इतर मान्यवर आदिंकडे, ते पाठवीत असतात. हा त्यांचा नित्याचाच उद्योग झालेला आहे. गेल्या दोन वर्षांतील तक्रारदारांची नांवे जर आपण पाहिलींत तर या विधानांची सत्यता आपणासही निश्चिपणे कळून येईल. संस्थानच्या विरोधातील तक्रारींचा परामर्श घेत असताना या विरोधी मंडळींचाही मागोवा घेणे तितकेंच आवश्यक आहे, असे नम्रपणे सुचवावेसे वाटतें. व्यवस्थापन मंडळावर विश्वस्त म्हणून नेमणुकीच्या वेळी इच्छुक उमेदवारांबाबत मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, हे विविध शासकीय यंत्रणांमार्फत (पोलीस इ.) माहिती घेत असतात. सदर तक्रारदारांबाबत अशा शासकीय यंत्रणांनी दिलेल्या अहवालांचे आपण

अवलोकन केल्यास तें उद्बोधक होईल, अशी खात्री आहे.''

''त्याच त्या खोटारड्या तक्रारींबाबत पुन्हा पुन्हा स्पष्टीकरण देण्याची पाळी मात्र दुर्दैवाने आमच्यावर येत आहे, हें खेदपूर्वक नमूद करावेसे वाटतें. असें करताना होणाऱ्या अनुत्पादक प्रदीर्घ परिश्रमांची व आत्यंतिक मानसिक त्रासाची शिक्षा आणखी किती वेळा असहाय्यपणे आम्ही भोगत रहावी, याचाही गांभीर्याने विचार कृपया व्हावा. ही निष्कारण छळणूक थांबण्यासाठी तक्रारदारांना त्यांच्या तक्रारीच्या सत्यतेबद्दल प्रथम शपथपत्र/प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगण्यात यावें किंवा त्या तक्रारींत निदान प्रथम दर्शनी तथ्यांश आढळून येतो का, हें पडताळून पहाण्यासाठी आवश्यक तो पुष्ट्यर्थ काहीतरी ठोस पुरावा सादर करण्यास सांगण्यात यावें, असें नम्रपणे सुचवावेसें वाटतें. वास्तविक तक्रारदाराने आरोप करताना एवढे तरी पथ्य पाळावयास हवें, असें म्हटल्यास वावगें ठरूं नये. अशा पुराव्याच्या अभावी स्पष्टीकरणे सादर करण्यास आपण कृपया आम्हास सांगू नये, अशी कळकळीची विनंती आहे. कृपया गैरसमज नसावा.''

क) विद्यमान व्यवस्थापन मंडळातील चार सदस्य, सर्वश्री प्रकाश वागस्कर, दास इनामदार, डॉ. अजेय गर्जे व डॉ. विलास पोतनीस यांनी दिनांक १७ मे, २००१ रोजी मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांना पाठविलेल्या पत्रान्वये विश्वस्त मंडळाच्या कारभाराबाबत सात तक्रारी-वजा-आरोप कळवून त्यासंबंधी चौकशी करण्याची विनंती केली होती. आश्चर्य म्हणजे, व्यवस्थापन मंडळाने घेतलेल्या ज्या निर्णयांबाबत मागाहून या तक्रारी व आरोप करण्यात आले होते ते सर्वच्या सर्व निर्णय एकमताने (तक्रारदार चार विश्वस्तांच्याही सहमतीने) पूर्वी घेण्यात आलेले होते ! पश्चात् बुद्धीने विपर्यास करून असे जे आरोप या चार विश्वस्तांनी केले होते त्यांचा रोख विशेषेंकरून वैयक्तिकरीत्या संस्थानचे अध्यक्ष यांच्यावर होता. या निवेदनातील सर्व आरोपांचे मुद्देसूद व सविस्तर निराकरण व खंडन करणारे तपशीलवार स्पष्टीकरण (संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह) मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांना संस्थानच्या (जा. क्र. एस्एस्एस्-वशी-मुं.-२४३८-२००१) दिनांक ७ जून, २००१ च्या पत्रान्वये तत्परतेने पाठविण्यात आलेले आहे. सदर पत्रातील निराधार व बदनामीकारक मजकुराला वारेमाप जाहीर प्रसिद्धी स्थानिक वर्तमानपत्रांतून त्याच वेळी देण्याचा हीन खटाटोपदेखील त्यांनी केल्यामुळे, या चार विश्वस्तांनी संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांच्यावर वैयक्तिकरीत्या अत्यंत गंभीर, गलिच्छ व निराधार आरोप करून त्यांचे जाणूनबुजून चारित्र्यहनन व जाहीरपणें बदनामी करणारें कृत्य केल्यावरून श्री. सुकथनकर यांनी ऑक्टोबर, २००१ मध्ये मा. महानगर दंडाधिकारी, आठवे न्यायालय (The Court of the Metropolitan Magistrate, 8th Court), एस्प्लनेड, मुंबई या न्यायालयात या चारही विश्वस्तांविरुद्ध इंडियन पिनल कोड, कलम ५०० अन्वये शिक्षेस पात्र असलेला (जाहीर बदनामी केल्याचा) गुन्हा केल्याची वैयक्तिक फौजदारी तक्रार (तक्रार २००१ चा क्र. 62/M) गुदरली आहे. या तक्रारीची पडताळणी श्री. सुकथनकर यांचे आवश्यक जाबजबाब घेऊन पूर्ण झाल्यावर व त्यांच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सदर तक्रारीची मा. महानगर दंडाधिकारी यांच्या न्यायालयाने औपचारिकपणे दखल घेतली असून (taken cognizance), उपरोक्त चारही विश्वस्तांना या तक्रारीसंबंधात न्यायालयामध्ये उपस्थित राहण्यासाठी प्रोसेस-तथा-समन्सही सदर न्यायालयाने काढलें आहे. अशा रीतीने या चारही विश्वस्तांनी फौजदारी गुन्हा केल्याची संस्थानचे अध्यक्ष यांची वैयक्तिक फौजदारी तक्रार आता न्यायप्रविष्ट आहे.

ड) संस्थानचे एक माजी विश्वस्त (१ सप्टेंबर, १९८४ ते ३१ ऑगस्ट, १९८९ आणि १ सप्टेंबर, १९८९ ते ३१ ऑगस्ट, १९९४) श्री. भिमाशंकर खांबेकर यांनी मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ६ जून, २००१ रोजीच्या पत्राद्वारे एच.डी.एफ.सी. लिमिटेड या वित्तसंस्थेत संस्थानतर्फे ठेवींच्या रूपाने करण्यात आलेल्या गुंतवणुकीबाबत तक्रार केली होती. (श्री. भिमाशंकर खांबेकर यांचे पुत्र श्री. अशोक खांबेकर हे संस्थानच्या गेल्या (१.९.१९९४ ते ३१.८.१९९९) व्यवस्थापन मंडळाचे सदस्य होते. श्री. अशोक खांबेकर हे पत्रकार असून विद्यमान व्यवस्थापन मंडळावर (१.९.१९९९ ते ३१.८.२००४) त्यांची पुनर्नियुक्ती न झाल्याने फारच वैफल्यग्रस्त होऊन ते स्वत: व त्यांचे वडील (श्री. भिमाशंकर खांबेकर) विद्यमान व्यवस्थापन मंडळाबाबत आकसाने वेगवेगळ्या

**प्रकारे खोटारडा प्रचार व निराधार आरोप-तथा-तक्रारी नेहमी करीत असतात). आश्चर्य म्हणजे त्याच आशयाची तक्रार विद्यमान व्यवस्थापन मंडळातील एक सदस्य श्री. प्रकाश वागस्कर यांनीही** त्याच दिवशी लिहिलेल्या (दिनांक ६ जून, २००१) पत्रान्वय **मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे केली होती.** या दोन्हीही तक्रारी मा. धर्मादाय आयुक्त यांच्याकडून दिनांक १९ जुलै, २००१ च्या दोन वेगवेगळ्या पत्रांसह (क्र. विधी /किरकोळ/२९/३-२००१/४३८०/२००१ आणि क्र. विधी/किरकोळ/२९-२००१/२-२००१/४३८१/२००१ संस्थानकडे त्यातील आरोप-वजा-तक्रारीसंबंधी खुलासा सादर करण्यासाठी प्राप्त झाल्या होत्या. वर म्हटल्याप्रमाणे **सर्वश्री खांबेकर व वागस्कर यांनी केलेल्या सदर तक्रारींचा आशय एकच असल्यामुळे त्या तक्रारींचे सविस्तर स्पष्टीकरण सर्व संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह संस्थानच्या (जावक क्र. एस्‌एस्‌एस्-वशी-मुं.-३१२७) दिनांक २९ ऑगस्ट, २००१ च्या पत्राद्वारे मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांना सादर करण्यात आलेलें आहे.**

ई) विद्यमान विश्वस्त मंडळाचे एक विश्वस्त श्री. प्रकाश वागस्कर यांनी दिनांक १९ जानेवारी, २००२ रोजी मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांना फॅक्सने तक्रार पाठवून श्री साईबाबा अॅडव्हान्स्ड इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (SAINT) या प्रकल्पासंबंधी कांही आक्षेप कळविले होते. मा. धर्मादाय सह आयुक्त (प्र), मुंबई, यांनी क्र. जे१/३४-२००२/अहमदनगर/देवस्थान/९५७/०२, दिनांक २१ जानेवारी, २००२ च्या पत्रान्वये यासंबंधात संस्थानकडून स्पष्टीकरण मागविलें होते, जें संस्थानच्या जावक क्र. एसएसएस-वशी-५०६-२००२, दिनांक ६ फेब्रुवारी, २००२ च्या सविस्तर पत्राद्वारे (सर्व संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह) तत्परतेने पाठविण्यात आले.

**फ) आणखी एक उल्लेखनीय तक्रार-वजा-आरोप असा कीं, अगदी अलीकडेच दिनांक २९ मार्च, २००२ रोजी (धुळवडीच्या दिवशी) श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विश्वस्त व अधिकारी - कर्मचारी यांचे जे स्नेहसंमेलन यशस्वीपणे पार पडले त्या स्नेहसंमेलनात, "सायलेन्स खटला चालू हाय !" या लोकप्रिय व पूर्वी इतरत्र शेकडों खेळ झालेल्या वगनाट्य एकांकिकेच्या प्रयोगासंबंधी आहे.** स्नेहसंमेलनातील सदर प्रयोगात संस्थानचे अध्यक्ष, दोन इतर विश्वस्त व काही कर्मचारी यांनी भाग घेतला होता. हा प्रयोग **दिनांक २९ मार्च, २००२ रोजी** सुमारे तीन हजार संस्थान कर्मचारी, शिरडी ग्रामस्थ आणि इतर साईभक्तांच्या उपस्थितीत सर्वांची उत्स्फूर्त दाद व प्रशंसा मिळून **संपन्न झाल्यावर तब्बल पंधरा दिवसांनंतर, या प्रयोगामुळे हिंदू देवदेवतांचा अपमान करण्यात येऊन साईभक्तांच्या धार्मिक भावना दुखावण्यात आल्या, द्व्यर्थी संवाद व तथाकथित अश्लिल हावभाव यांद्वारे राधाकृष्णाच्या प्रेमाचे तथाकथित विडंबन करण्यात आले, संस्थानचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. स्मिता जयकर यांनी या प्रयोगात रंगमंचावर नाच-फुगडी घालून अनुचित वर्तन केले, आदि आशयांची पश्चात् बुद्धीने, बारेमाप व खोटारडी टीका आणि प्रचार वर्तमानपत्रांद्वारे पूर्वनियोजित पद्धतीने करण्यात आला. हा मागाहून जाणूनबुजून करण्यात आलेला कुप्रसिद्धीचा खटाटोप, दुर्दैवाने, संस्थानचेच एक विश्वस्त डॉ. अजेय गर्जे यांनी स्थानिक दोन-चार पत्रकार व इतर व्यक्तींना हाताशी धरून, केवळ संस्थान, संस्थानचे विश्वस्त मंडळ व विशेषेंकरून या नाट्यप्रयोगात भाग घेतलेले संस्थानचे अध्यक्ष व दोन इतर विश्वस्त यांची निंदानालस्ती व बदनामी करण्याच्या दृष्टीनेच केला होता, हें आतां सर्वांनाच उघड झालें आहे.** यासंबंधात सर्व वस्तुस्थिती मांडणारे आणि जे आरोप करण्यात आले होते ते कसे पूर्वग्रहदूषित व निराधार आहेत हें विशद करणारे सविस्तर निवेदन आम्ही आपणास अलाहिदा सादर केलेलेच आहे.

४. वरील परिच्छेदात विद्यमान व्यवस्थापन मंडळावर व विशेषेंकरून मंडळाच्या अध्यक्षांवर ज्या प्रमुख निराधार तक्रारी व आरोप आजतागायत वेळोवेळी करण्यात आलेले आहेत तेवढ्यांचाच उल्लेख व त्यासंबंधात संस्थानतर्फे माननीय धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे विनाविलंब सादर केलेल्या स्पष्टीकरण-तथा-खुलाशाचाही उल्लेख संक्षिप्तपणे केला आहे. त्याव्यतिरिक्त आलेल्या बऱ्याच गौण स्वरूपाच्या तक्रारी व त्यांबाबत संस्थानतर्फे सादर करण्यात आलेला खुलासा यांचा उल्लेख, या पत्राच्या विस्ताराची मर्यादा लक्षात घेतां, मुद्दाम टाळला आहे. या सर्व निराधार व खोटारड्या तक्रारी - तथा - आरोप (अ) संस्थानने अलीकडच्या काळात पूर्ण केलेल्या विविध विकास कामांमुळे ज्यांचे पूर्वापार प्रस्थापित हितसंबंध दुखावले गेले (उदा. उपहारगृह, लॉज व हॉटेल मालक) अशा व्यक्तींकडून, (ब) शिरडी व परिसरातील काही महत्त्वाकांक्षी व्यक्ती - ज्यांची संस्थानच्या व्यवस्थापन मंडळावर नियुक्ती झाली नाही - यांच्याकडून आणि (क) ईर्षेने पेटलेल्या व असंतुष्ट अशा काही स्थानिक 'पुढाऱ्यांकडून' (ज्या तथाकथित पुढाऱ्यांना काही महिन्यांपूर्वी झालेल्या शिरडी

नगरपंचायतीच्या निवडणुकीत पराभूत करून शिरडीवासियांनी त्यांचे योग्य ते स्थान दाखवून दिले) केवळ आकसाने केले जात असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. विद्यमान व्यवस्थापन मंडळाचे गठन झाल्यानंतर, या मंडळातील वर उल्लेख केलेल्या चार विश्वस्तांनी (सर्वश्री वागस्कर, इनामदार, डॉ. गर्जे व डॉ. पोतनीस) वैयक्तिक वा एकत्रितपणे केलेल्या कुरबुरी व बिनबुडाच्या तक्रारींमुळे यांत दुर्दैवाने भर पडली आहे. ''आम्हा नवनियुक्त चार विश्वस्तांचे ऐकून घेतले जात नाही, आम्हाला कमीपणाची वागणूक दिली जाते'', असा चुकीचा ग्रह सुरुवातीपासूनच निष्कारण करून घेऊन या चौघांनी आपला जणू 'विरोधी गट' स्थापन केला आहे. तसें करून आणि एरवीं उत्तम प्रकारें चाललेल्या कार्यात वेळोवेळी मोडता घालून त्यांना काय मिळवावयाचें आहे हें खरोखरच समजून येत नाही. इतर बहुसंख्य १२ नवनियुक्त विश्वस्तांना मात्र असे कदापिही वाटलेले नाही. यावरूनच हे 'विरोधी गट' स्थापन केलेले चार विश्वस्त केवळ न्यूनगंड व वैफल्याच्या भावनेने ग्रासले आहेत व त्यामुळेच ते असे करीत असतात, असे म्हणण्याशिवाय पर्याय नाही. अल्पसंख्येने असलेल्या वरील सर्व तक्रारदारांकडून **वेळोवेळी करण्यात आलेल्या आरोपांचे मुद्देसूद व तपशीलवार (संबंधित कागदपत्रांसह) खंडन संस्थानकडून केले गेल्यानंतर महिनोन्महिने उलटून गेले तरी त्यासंबंधीची शहानिशा पूर्ण न केली गेल्यामुळे या आरोपांची लटकती तलवार मात्र विद्यमान व्यवस्थापन मंडळाच्या शिरावर निष्कारण सतत टांगती राहिली आहे ! जरी या सर्व बिनबुडाच्या तक्रारी व आरोपांत वस्तुत: काहीही तथ्य नसलें तरी, त्यांचे औपचारिकपणे निराकरण न झाल्यामुळे त्या निराधार तक्रारी करणाऱ्यांना व इतरांना त्याच त्या तक्रारींना पुन्हा पुन्हा उजाळा देण्याची संधी निष्कारण मिळते. या परिस्थितीचा गैरफायदा घेण्यासाठी गोबेल्स नीतीचा वापर करून अशा जुन्या व बिनबुडाच्या तक्रारींचा पुनरुच्चार या विघ्नसंतोषी मोजक्या व्यक्ती नेहमी करीत असतात; एवढेंच नव्हे, तर नव्या काल्पनिक व निराधार तक्रारी करण्यासही ते सहजपणे धजावतात.**

**५. वास्तविक काळजीपूर्वक नियोजन करून व परिश्रम घेऊन विद्यमान व तत्पूर्वीच्या (१९९४-१९९९) व्यवस्थापन मंडळाने साईभक्तांना विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देणे, शैक्षणिक व वैद्यकीय सेवा आदि सार्वजनिक धर्मादाय कार्य-प्रकल्प नव्याने राबविणे, शिरडी नगराचा विकास साधणे आदि अत्यंत भरीव व सर्वसाधारण लोकांच्या प्रशंसेस पात्र ठरलेले विस्तृत व विविधांगी कार्य गेल्या सुमारे साडेसात वर्षांच्या कालावधीत केले आहे. त्यांतील कांही ठळक बाबींचा येथे उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही. या बाबी पुढीलप्रमाणे :-**

### (१) साईभक्तांसाठी विविधांगी सेवा-सुविधा :-

**अ) समाधी मंदिर पुनर्विकास :** अखिल भारतीय पातळीवर वास्तुविशारदांची (आर्किटेक्ट्स) खास स्पर्धा आयोजित करून त्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पात्र ठरलेल्या संकल्पना-तथा-योजनेच्या आराखड्यानुसार समाधी मंदिराच्या संपूर्ण परिसराचा (त्यातील इमारतींसह) अत्यंत रेखीव व आकर्षकपणे, परंतु तेवढ्याच साधेपणाने, पुनर्विकास - दर्शनासाठी आलेल्या साईभक्तांची उन-पाऊस यांच्यापासून रक्षण करणारी, सर्व सोईंनी युक्त, आरामदायी आणि एकाच वेळी सुमारे १५,००० भक्त सामावू शकतील अशी दर्शनबारीची सुव्यवस्था - मंदिर परिसरात विविध ठिकाणी क्लोज्ड सर्किट दूरचित्रवाणी संचाद्वारे भक्तांना मंदिर गाभाऱ्यातील बाबांच्या मूर्तीचे दर्शन घेण्याची सतत सोय. **मंदिर परिसराचा घडविलेला हा आमूलाग्र कायापालट प्रथमच पहाणाऱ्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.**

**आ) पुरातन वास्तुंचे जतन - सुदृढीकरण - पुनर्विकास :** मूळ समाधी मंदिर (बुट्टी वाडा), गुरुस्थान, द्वारकामाई, चावडी, बाबांच्या समकालीन भक्तांच्या समाध्या, जुनी श्री गणेश, श्री शनी, श्री महादेव ग्राममंदिरे, लेंडीबाग आदि पुरातन वास्तु व पवित्र स्थानांचे काळजीपूर्वक जतन - सुदृढीकरण - तथा - पुनर्विकास

**इ) अतिभव्य सुलभ प्रसाधनगृहाची उभारणी :** बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस येणाऱ्या परंतु शिरडीस मुक्काम न करता शुचिर्भूत होऊन बाबांचे दर्शन घेऊन लागलीच प्रयाण करू इच्छिणाऱ्या हजारो साईभक्तांच्या सोईसाठी अखिल आशिया खंडातील **सर्वांत विशाल अशा १२० शौचकूप व १२० स्नानगृहे (महिला व पुरुषांसाठी प्रत्येकी ६०) असलेल्या भव्य 'सुलभ प्रसाधनगृहा'ची उभारणी.**

**ई) साईभक्तांसाठी दोन जादा धर्मशाळा इमारती :** त्यावेळी (१९९४) चालू असलेल्या नवीन भक्तनिवास (५०० खोल्या) इमारतीचे बांधकाम पूर्ण करून ती साईभक्तांच्या निवासासाठी उपयोगात आणल्यानंतर लगेच **दोन जादा धर्मशाळा व सार्वजनिक कॅंटीनच्या इमारतींचे नव्याने बांधकाम** हाती घेऊन व सत्वर पूर्ण करून जादा सुमारे २ हजार भक्तांसाठी, सर्व सेवा-सुविधांनी युक्त अशी, परंतु अत्यंत किफायतशीर भाडे असलेली, निवासाची व उपहार-भोजनाची सोय.

**उ) पूर्ण वेळ प्रसादालय :** साईभक्तांना केवळ दुपारी व रात्री भोजन-प्रसाद मिळण्याची व्यवस्था संस्थानच्या प्रसादालयाद्वारे पूर्वी उपलब्ध होती तिची व्याप्ती वाढवून सकाळी नाश्ता (पुरी-भाजी व एक गोड पदार्थ) व त्यानंतर **सकाळी १० ते रात्री १० असे अखंड १२ तास भोजन-प्रसादाची, केवळ दरडोई रु. ४/- एवढे अल्प शुल्क आकारून, उत्तम सोय.**

**ऊ) प्रसादालयातील स्वयंपाकासाठी सौरशक्ती संयंत्राची उभारणी :** प्रसादालयात अन्न शिजविण्यासाठी इंधन म्हणून एल.पी.जी. गॅसचा वापर यापूर्वी करण्यात येत असे. इंधनाच्या खर्चात बचत करण्याच्या दृष्टीने, **अन्न शिजविण्याकरिता विस्तृत सौरशक्ती संयंत्राची (Solar Cooking System) उभारणी** - असा हा **संपूर्ण महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचा भव्य प्रकल्प असून तो खरोखरच अनेकांना मार्गदर्शक व सर्वांच्या कुतुहलाचा विषय ठरला आहे.**

**ए) साईनाथ वस्तुसंग्रहालयाची नव्याने स्थापना :** बाबांच्या हस्त व पदस्पर्शाने पुनीत झालेल्या विविध वस्तू, बाबांचे अंगरखे आदि वस्त्रे, पुरातनकालीन स्थितीचे दर्शन घडविणाऱ्या तसबिरी अशा विविध पुरातन वारसा वस्तूंचे योग्य प्रकारे दर्शन साईभक्तांना घडावे या दृष्टीने श्री साईनाथ वस्तुसंग्रहालयाची नव्याने उभारणी.

**ऐ) साईभक्तांसाठी विविध सेवा दालने :** साईभक्तांना अभिषेक पूजा, साईसत्यव्रत पूजा, पारायण आदि धार्मिक विधी तथा - सेवा साईचरणी रुजू करता याव्या याकरिता या प्रत्येक विधी-सेवांसाठी सर्व सोईंनी युक्त अशा वेगवेगळ्या दालनांची (हॉल्स) उभारणी.

**ओ) रेल्वे व एस्.टी.च्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षणाची सोय :** साईभक्तांना आपल्या प्रवासासाठी रेल्वे व एस्.टी.बसमधील आसनांचे आगाऊ आरक्षण विनासायास व सुलभ पद्धतीने करता यावे या दृष्टीने समाधी मंदिर परिसरातच अशा आरक्षणाची नव्याने सोय.

**(२) संस्थानच्या साईनाथ रुग्णालय व वैद्यकीय सेवांत भरीव वाढ आणि वैद्यकीय उपचार इतरत्र करून घेण्यासाठी आर्थिक मदत :-** **साईनाथ रुग्णालयाचा क्रमशः विस्तार करून तेथे सुमारे २०० खाटांची (अंतरुग्णांच्या उपचाराची) सोय व विविध विशेष उपचारांच्या (Specialities) सोयींत वाढ आणि आधुनिक वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्रींत वेळोवेळी टाकण्यात आलेली भर - रक्ताचे पृथ;करण करून रक्ताचे विविध घटक एवं पूर्ण रक्त उपलब्ध करून देण्याकरिता अत्यंत आधुनिक आणि अहमदनगर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाच्या भव्य व आधुनिक रक्तपेढीची नव्या इमारतीसह स्थापना** - फिरत्या वैद्यकीय पथकाकरवी शिरडी परिसरातील गावांना भेटी देऊन तेथील रुग्णांना व इतरांसाठी वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन - तथा - प्राथमिक उपचारांची सोय - **निम्न उत्पन्न गटातील रुग्णांना शस्त्रक्रिया तथा वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत देण्याच्या योजनेचा विस्तार (अशा मदतीवरील वार्षिक खर्च यंदा सुमारे रु. ३ कोटी)**

**(३) विविध शैक्षणिक सेवा-सुविधांत विविधांगी वाढ :-** संस्थानच्या आय.टी.आय., मराठी माध्यमाची कन्याशाळा व इंग्रजी माध्यमाची शाळा याकरिता आधुनिक प्रयोगशाळा, क्रीडांगण आणि सर्व सोईंनी युक्त अशा इमारती आदि सुविधा असलेल्या **भव्य शैक्षणिक संकुलाची उभारणी** - आय.टी.आय.मध्ये नवीन आधुनिक प्रशिक्षणक्रमांची (टर्नर, टुल ॲण्ड डायमेकर, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी आणि इलेक्ट्रॉनिक सिस्टम मेन्टेनन्स) नव्याने भर व **नवीन इमारत, यंत्रसामुग्री आणि उपकरणे यांसह विस्तृत कार्यशाळेची (वर्कशॉप) उभारणी करून त्याद्वारे संपूर्ण नाशिक रिजनच्या एकूण चार जिल्ह्यांत 'अ' हा अत्युच्च दर्जा प्राप्त असलेली एकमेव खाजगी आय.टी.आय. -**

मुलींसाठी कन्या विद्यामंदिराचा विज्ञान शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत (इयत्ता ११वी व १२वी) संपूर्ण विकास - इयत्ता १२वी (H.S.C.) परीक्षेस प्रथमच बसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या या पहिल्याच विद्यार्थिनी तुकडीतील सर्वच्या सर्व (१००%) विद्यार्थिनी अलीकडेच दिनांक २२ मे, २००२ रोजी लागलेल्या निकालानुसार उत्तीर्ण - इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा इयत्ता १०वी (S.S.C.) पर्यंत पूर्ण विकास आणि गेल्या वर्षी प्रथमच एस्.एस्.सी. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थीवृंदाचा १०० टक्के उत्तीर्ण हा निकाल - विविध क्रीडास्पर्धांमध्ये राज्यपातळीपर्यंत विद्यार्थी-विद्यार्थिनींकरवी प्राविण्य संपादन - बालविद्यार्थ्यांना संगीताचे व वाद्यांचे प्रशिक्षण देऊन बालवाद्यवृंदाची (orchestra) स्थापना, जो वाद्यवृंद फारच लोकप्रिय व सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला आहे.

**(४) मंदिर परिसर, संस्थान इमारती व सेवा-सुविधास्थाने आदि ठिकाणी सुशोभिकरण - सौंदर्यीकरण आणि पर्यावरण संवर्धन :-** मंदिर परिसर, अधिकारी आणि कर्मचारी निवासस्थाने परिसर, रुग्णालय - ब्लड बँक परिसर, संस्थान पाणीपुरवठा तळी-जलप्रक्रिया-केंद्र परिसर, नवीन भक्तनिवास व धर्मशाळा इमारती परिसर इत्यादी ठिकाणी **लँड स्केपिंग करून वृक्ष, फुलझाडे, गुलाब बाग, कॅक्टस हाऊस, नर्सरिज, ग्रीन हाऊसेस, हिरवळ, कारंजी, कृत्रिम धबधबा (लेंडीबागेत), आकर्षक गेट्स (प्रवेशद्वारें) आदि निर्माण करून संस्थानच्या मिळकतीतील विविध ठिकाणांचे सुशोभिकरण, सौंदर्यीकरण, पर्यावरण संवर्धन आणि आल्हाददायक वातावरणाची निर्मिती.**

**(५) शिरडीवासियांसाठी सेवा-सुविधा व शिरडी नगराच्या परिसराच्या विकासास हातभार :-** वर उल्लेखिलेल्या विविध विकास प्रकल्प व कामांद्वारे संस्थानच्या उद्दिष्टपूर्तीबरोबरच शिरडी नगर व शिरडी परिसर यांच्या विकासास हातभार लावण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष पुरविण्यावर भर - गावातील (विशेषेंकरून समाधी मंदिराच्या भोवतालच्या) रस्त्यांचे काँक्रिटीकरण/डांबरीकरण, अहमदनगर-मनमाड रस्त्यावर सिमेंटच्या दुभाजकांची उभारणी - **शिरडी नगरातील रहिवाश्यांसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याकरिता द्याव्या लागणाऱ्या विहित लोकवर्गणीतील बहुतांश हिस्सा (सुमारे ९० टक्के, म्हणजेच सुमारे रु. दीड कोटी) शिरडी नगरपंचायतीला संस्थानतर्फे अनुदान म्हणून देण्यास आणि उर्वरित खर्चाच्या ५० टक्के रक्कम (सुमारे रु. ६ कोटी) संस्थानकडून सवलतीच्या व्याजदराने कर्ज म्हणून उपलब्ध करून देण्यास मान्यता - शिरडी परिसरातील गावांत भूजलपातळी उंचावण्याच्या दृष्टीने** व त्याद्वारे परिसरातील विहिरींना पाझराद्वारे जादा पाणी उपलब्ध होण्याच्या हेतूने श्री गणेश सहकारी साखर कारखाना, गणेश नगर यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक नाल्यांचे पाणी अडविण्याकरिता **पक्क्या भिंती बांधून एकूण सात ठिकाणी श्री साई बंधाऱ्यांची (गणेश बंधारे) उभारणी** - शिरडीवासियांच्या उपयोगासाठी बांधण्यात आलेल्या मंगल कार्यालयाचे विस्तारीकरण - **शिरडी बाजारतळ आदि ठिकाणी सार्वजनिक शौचालय व स्नानगृहांचे संस्थानच्या खर्चाने बांधकाम.**

**(६) संस्थान अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कल्याणासाठी विविध योजना व उपक्रम :-** संस्थानचे अधिकारी आणि कर्मचारी यांना पाचव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या व शासनाने मान्य केलेल्या सुधारित वेतनश्रेणींचा लाभ लागू - वेळोवेळी वाढीव महागाई व इतर भत्ते, सानुग्रह अनुदान, गणवेष आदि आर्थिक व इतर लाभ - तथा - सवलती, कुंठितता निवारण योजनेनुसार कालबद्ध पदोन्नतीची शासनमान्य योजना लागू - **अधिकारी व तांत्रिक तथा इतर कर्मचाऱ्यांसाठी जादा स्वयंपूर्ण निवासस्थानांचे बांधकाम - कर्मचाऱ्यांना आपले स्वतःचे घरकुल बांधण्यास उद्युक्त करण्यासाठी अशा बांधकामाकरिता मान्य गृहवित्त संस्थेतर्फे घेतलेल्या कर्जाच्या व्याजदरात सवलत (६ टक्केपेक्षा अधिक असलेल्या व्याजाचा आर्थिक भार संस्थानने सबसिडीद्वारे उचलून) देण्याची योजना लागू** - वैद्यकीय उपचारावरील खर्चाची विहित नियमांच्या आधीन प्रतिपूर्ती - अकाली मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या एका पाल्यास अनुकंपा तत्त्वावर संस्थान सेवेत नियुक्ती देण्याची सवलत - **ग्रूप ग्रॅच्युइटी व इन्श्युरन्स योजना संस्थानखर्चाने सर्व संस्थान अधिकारी व कर्मचारी यांना लागू - कर्मचाऱ्यांना संस्थानच्या खर्चाने संगणकाचे प्रशिक्षण** - अशा विविध कर्मचारी कल्याण योजना व उपक्रम राबल्यामुळे संस्थान व्यवस्थापन व कर्मचारी यांच्यात परस्पर सौहार्द व सामंजस्याचे वातावरण वृद्धिंगत.

**(७) शासकीय विभाग व उपक्रमांना हातभार व मदत :-** शिरडी नगरात नगर-मनमाड राज्य

मार्गावर सध्या उपयोगात असलेली शिरडी पोलीस स्थानकाची इमारत संस्थाननेच यापूर्वी बांधून दिलेली होती. ती अपुरी पडू लागल्यामुळे पोलीस विभागाच्या विनंतीनुसार शिरडी येथील पोलीस वसाहतीच्याच विस्तृत जमिनीवर संस्थानतर्फे सर्व सोईंनी युक्त अशी पोलीस स्थानकाची नवीन इमारत (सुमारे रु. १६ लाख एवढ्या खर्चाने) बांधून ती संस्थानने शिरडी पोलीस स्थानकासाठी उपलब्ध करून दिली आह व त्या इमारतीतच आता पोलीस उपअधीक्षक यांचेही छोटेखानी कार्यालय सुरू करण्यात आले आहे. त्याचप्रमाण जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी अहमदनगर येथे जिल्ह्यातील आम जनतेच्या सुविधेसाठी स्थापन केलेल्या शासकीय 'बहुविध सेवा केंद्र - तथा - एक खिडकी योजने'करिता संगणक, प्रिंटर्स, सर्व्हर आदि आधुनिक उपकरणे संस्थानने आपल्या निधीतून खर्च करून उपलब्ध करून दिली आहेत. अलिकडेच शिरडी येथील शासकीय विश्रामगृहाला होणारी सततची पाणीटंचाई दूर व्हावी म्हणून संस्थानच्या पाणीपुरवठा योजनेतून जलजोडणी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या अल्पबचत योजनेअंतर्गत प्रतिवर्षी कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करून अहमदनगर जिल्ह्याच्या अल्पबचतीच्या लक्ष्यांकाची पूर्तता करण्यास संस्थानने भरीव हातभार लावला आहे. लातूर व कच्छमधील भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्ती तथा दुर्घटनांनी ग्रस्त झालेल्यांच्या मदत व पुनर्वसनासाठी संस्थानने मोठ्या रकमेचे आर्थिक अनुदान नि:संकोचपण उपलब्ध करून दिले आहे.

**(८) श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार :-** श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार मुख्यत्वे संस्थानतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या व येणाऱ्या ग्रंथ व इतर वाङ्मयाद्वारे आणि संस्थानतर्फे नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या 'श्री साईलीला' (अ. मराठी व ब. हिंदी-इंग्रजी भाषेतील) द्वैमासिकातर्फे करण्यात येतो. हे ग्रंथ व प्रकाशित वाङ्मय सामुग्री (त्यात वेळोवेळी नव्याने भर टाकून) आकर्षक स्वरूपात पुनर्मुद्रित वा नव्याने मुद्रित करून सर्वांना नेहमी उपलब्ध राहील याची दक्षता घेण्याचा व्यवस्थापन मंडळाने कटाक्षाने प्रयत्न केलेला आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाद्वारेदेखील बाबांच्या शिकवणुकीचा व संस्थानने हाती घेतलेल्या विविध कार्याची व उपक्रमांची माहिती सर्व साईभक्तांना व कुतुहल असलेल्या इतर व्यक्तींना सुलभ रीतीने उपलब्ध व्हावी याकरिता संस्थानने आपली स्वतंत्र 'वेबसाइट' गेल्या सुमारे दोन वर्षांपूर्वी स्थापून कार्यान्वित केली आहे. याव्यतिरिक्त शिरडी येथे कीर्तने, प्रवचने, श्री साईसच्चरिताची पारायणे, आध्यात्मिक साधना शिबिरे आदि उपक्रम वर्षभरात अधिकाधिक उचित प्रसंगी आयोजित करण्यावरही व्यवस्थापन मंडळाने, विशेषेंकरून अलिकडच्या काळात, जाणीवपूर्वक भर दिला आहे.

**(९) संस्थानच्या गंगाजळीत (अतिरिक्त - तथा - शिल्लक निधीच्या गुंतवणुकीत) आणि स्थावर व जंगम मिळकतीत लक्षणीय वाढ :-** वर नमूद केल्याप्रमाणे बहुविध विकासाची कामे व योजना, कर्मचारी कल्याण योजना, यांसह संस्थानचा दैनंदिन कारभार पार पाडताना सर्व आर्थिक व्यवहार, अतिरिक्त निधीची गुंतवणूक आदि आर्थिक व्यवस्थापनाच्या विविध बाबी सुबुद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने आणि विहित कार्यपद्धती आणि आर्थिक काटकसरीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून काळजीपूर्वक हाताळल्यामुळे, वाढता दैनंदिन प्रशासकीय खर्च पेलून आणि अनेक विकासकामे व योजनांवर जाणीवपूर्वक मोठा भांडवली खर्च करूनही, संस्थानच्या गंगाजळीत झालेली वाढ निश्चितपणे लक्षणीय अशी म्हणता येईल. १९९४च्या अखेरीस या गंगाजळी - तथा - अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीची रक्कम केवळ रु. १८ कोटीच्या आसपास होती ती आजमितीस (केवळ सात वर्षानंतर) रु. १३० कोटीपेक्षाही (सातपटींपेक्षाही) अधिक झालेली आहे ! त्याचबरोबर संस्थानच्या जमिनी, इमारती व इतर कामे आणि उर्वरित स्थावर व जंगम एकूण मिळकतींचे मूल्य (value of lands, buildings and works and other moveable and immoveable assets, at cost) आर्थिक वर्ष १९९३-९४च्या अखेरीस रु. १८.२१ कोटी एवढे होते ते गेल्या सात वर्षांच्या कालावधीत, म्हणजेच आर्थिक वर्ष २००० - २००१ च्या अखेरीस, तिपटीपेक्षाही अधिक वाढून रु. ५७.५२ कोटीवर पोहचले होते व गेल्या वर्षभरात त्यात आणखी भर पडली आहे. वानगीदाखल दिलेली वरील आकडेवारी ही विद्यमान व तत्पूर्वीच्या व्यवस्थापन मंडळाने (१९९४-१९९९) काळजीपूर्वक केलेल्या आर्थिक व्यवस्थापनाचेचे द्योतक आहे, असे म्हटल्यास अनाठायी होणार नाही.

६. वरीलप्रमाणे विविधांगी विकासकार्ये व प्रकल्प कार्यान्वित केल्यानंतर केवळ तेवढ्यावरच कृतकृत्य व समाधान झाल्याचे न मानता विद्यमान व्यवस्थापन मंडळाच्या उर्वरित सुमारे सव्वा दोन वर्षांच्या कालावधीत संस्थानच्या विविध उद्दिष्टांच्या पूर्तीच्या दृष्टीने आणखीही सुयोग्य अशा विकासाच्या योजना व कामे हाती घेण्याचे ठरवून त्या

दृष्टीने मंडळाने आवश्यक ती पावले उचलली आहेत. या संकल्पित योजना व प्रकल्पांचा संक्षिप्त तपशील खाली उद्धृत करीत आहोत :-

**(१) श्री साईबाबा संस्थान, शिरडी आणि इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटी (IIMV), पुणे या संस्थेच्या सहकार्याने व संयुक्त विद्यमाने कार्यान्वित करावयाचा 'सेंट' (SAINT) व इतर अनुषंगिक घटक असलेला विविधांगी प्रकल्प :** आंतरराष्ट्रीय कीर्तीप्राप्त माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ व 'महाराष्ट्र भूषण' डॉ. विजय भटकर व त्यांचे सहकारी यांनी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान यांचा सर्वसामान्यांमध्ये प्रसार करण्याच्या दृष्टीने पुणे येथे स्थापन केलेल्या इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटी (IIMV) या संस्थेने सादर केलेल्या या प्रकल्पाच्या सविस्तर (१३ खंड असलेल्या) अहवालाचे (DPR - Detailed Project Report) त्यानंतर जाणीवपूर्वक नियुक्त केलेल्या स्वतंत्र तज्ज्ञ समितीने सविस्तर परीक्षण करून दिलेल्या अंतिम सल्ल्यानुसार मान्य करण्यात आलेल्या या संयुक्त प्रकल्पाचे खालीलप्रमाणे महत्त्वाचे घटक आहेत :-

**अ) 'इ'-टेम्पल :** शिरडी येथील मंदिर व मंदिर परिसर यांचे आधुनिकीकरण करून मंदिर परिसराचा अंतर्गत लाइट्स, अत्याधुनिक ध्वनीयंत्रणा-तथा-व्यवस्था आणि लेझर यांच्या सहाय्याने आधुनिक 'इ'-टेम्पल म्हणून विकास करणे, जेणेकरून बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांनी अतिशय उत्कटपणे भक्तिभावाची व साईबाबांच्या अनुभूतीची जाणीव होऊ शकेल.

**ब) संस्थान कारभाराचे (संस्थानच्या कार्यालयांतर्गत विविध विभागांचे) संपूर्ण संगणकीकरण :** अंतर्गत संगणकीय जाळ्याद्वारे विविध प्रकारच्या माहितीची देवाण-घेवाण व समन्वयपूर्वक कार्यप्रणालीचा अवलंब, जेणेकरून संस्थान प्रशासनात तत्परता, कार्यक्षमता व गतिमानता येईल. त्याचबरोबर सर्व जगभर पसरलेल्या साईभक्तांना साईबाबांची शिकवण, शिरडीचे ऐतिहासिक महत्त्व, शिरडीला येण्याचे मार्ग व वाहतूक व्यवस्था, संस्थानकडील उपलब्ध सेवा-सुविधा, समाधी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, संस्थानची कामकाज पद्धती आदि सर्व बाबींची आवश्यक माहिती इंटरनेट जाळ्याद्वारे उपलब्ध होऊ शकेल.

**क) माहिती तंत्रज्ञानाचे प्रगत प्रशिक्षण देणारी संस्था (SAINT - Sai Baba Advanced Institute of Information Technology):** आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त प्रशिक्षणक्रमांशी समकक्ष असे **(१) Post-Grad-IT Course** (निवासी व पूर्ण वेळ असा एक वर्ष कालावधीचा प्रशिक्षणक्रम) व **(२) Grad-IT Course** (प्रति दिन दोन तास याप्रमाणे प्रत्येकी चार महिन्यांच्या दोन सत्रातील अर्धवेळ प्रशिक्षणक्रम) या संस्थेतर्फे चालविण्यात येतील. **या प्रशिक्षण कार्यक्रमाबरोबरच वैज्ञानिक व आध्यात्मिक अनुभूती कार्यक्रमाद्वारे शिरडी येथे येणाऱ्या भक्तांस/प्रेक्षकांस आध्यात्मिक ज्ञानाबरोबरच आधुनिक ज्ञान-विज्ञानाची ओळख करून देण्यात येईल.**

**ड) Web - services framework for Community Learning and Information Centres (CLIC) :** शिरडी भोवतालच्या ग्रामीण भागात विविध माहिती तंत्रज्ञान सेवा **(e-Learning, e-Commerce, e-Governance facilities and other miscellaneous services)** सर्वसामान्य लोकांना किफायतशीर भावात उपलब्ध व्हाव्या व त्याद्वारे त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा झपाट्याने सुधरावा या दृष्टीने अशा केंद्रांची स्थापना घडवून आणण्यात येईल.

वरील बहुढंगी आधुनिक प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात म्हणून समाधी मंदिराचा 'इ'-टेम्पल म्हणून विकास करण्याच्या दृष्टीने कार्यवाहीस आरंभ करण्यात आला आहे व पुढील दोन वर्षात उर्वरित टप्पेही क्रमशः कार्यान्वित करण्यात यावयाचे आहेत.

**(२) संस्थानच्या साईनाथ रुग्णालयाच्या इमारतीचे फेरबदलासह नूतनीकरण व रुग्णालयाचा विस्तार :** साईनाथ रुग्णालयाची सध्याची इमारत जुनी झाली आहे. या रुग्णालयाद्वारे (अ) आज देण्यात येणाऱ्या विविध वैद्यकीय सेवा विस्तारून त्या आधुनिक तंत्र व पद्धतीने देण्याची व त्याबरोबरच (ब) नवीन गरजांनुसार आवश्यक असलेल्या जादा विशेष वैद्यकीय सेवादेखील (specialities) संख्येत सतत वाढ होत असलेल्या रुग्णांना उपलब्ध करून देण्याची या रुग्णालयाची क्षमता व्हावी या दृष्टीने, रुग्णालयाच्या सध्याच्या मुख्य इमारतीचे डागडुजी व आवश्यक फेरबदलासह नूतनीकरण

आणि या इमारतीच्या पश्चिम बाजूस असलेल्या स्टाफ क्वार्टर्सच्या दोन लहान जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन (तळमजल्यासह) तीन मजली भव्य इमारत बांधण्याच्या एकूण योजनेस व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली आहे. ही योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

**(३) प्रसादालय नूतनीकरण :** सध्याच्या प्रसादालयाचे पूर्णपणे नूतनीकरण करून आधुनिक पद्धतीचे पाकक्रिया व्यवस्था व भक्तांसाठी सुधारित प्रसाद-भोजन वितरण व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विस्तृत योजनेस व्यवस्थापन मंडळाने अलिकडेच मान्यता दिली असून ही योजना अंमलात आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**(४) नव्याने बांधलेल्या धर्मशाळा परिसरात साईभक्तांसाठी स्वयंपूर्ण (self-contained) खोल्या असलेल्या नवीन निवासस्थान इमारतीचे निर्माण :** साईभक्तांची संख्या सतत वाढत आहे. त्यामुळे त्यांच्या निवासासाठी संस्थानने निर्माण केलेल्या व्यवस्थेत वाढ करणे क्रमप्राप्त आहे. या दृष्टीने, आधुनिक गरजांनुसार सर्व सुविधायुक्त व स्वयंपूर्ण अशा सुमारे २०० निवासी खोल्या असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे आराखडे व खर्चाचे अंदाज यांस व्यवस्थापन मंडळाने अलिकडेच मंजुरी दिली असून हे नवीन बांधकाम हाती घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पुढील कार्यवाही सुरू आहे.

**(५) लँड बँक :** संस्थानच्या विविध कार्यक्षेत्रांतील भविष्यकालीन योजना कार्यान्वित करण्यास योग्य जमिनीच्या अनुपलब्धतेची अडचण राहू नये या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून शिरडी परिसरातील सुयोग्य ठिकाणांची एकूण सुमारे १५० एकर जमीन खरेदी करण्यास व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली आहे. जमिनीचे हे संपादन सत्वर पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या मध्यस्थी व सल्ल्याने सदर मंडळाशीं विचारविनिमय व वाटाघाटी प्रगत स्तरावर असून हा व्यवहार लवकरच संपन्न होईल, असा विश्वास वाटतो.

**(६) शिरडी नगरातील सेवा-सुविधांच्या विकासास हातभार :** शिरडी नगराची वाढीव पाणीपुरवठा योजना सत्वर कार्यान्वित व्हावी या दृष्टीने संस्थानने देऊ केलेल्या अनुदान (विहित लोकवर्गणी रकमेचा ९० टक्के हिस्सा) व अल्पदराचे कर्जसहाय्य यांचा उल्लेख वर आलाच आहे. त्याशिवाय, समाधी मंदिराच्या जवळच (पूर्वेकडे) जी जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आज आहे (व जिची इमारत अत्यंत जुनी झालेली आहे) तिचे स्थलांतर करण्याकरिता **प्राथमिक शाळेसाठी शिरडी विकास योजनेअंतर्गत आरक्षित असलेला खाजगी भूखंड संपादन करून त्यावर भविष्यकालीन गरजदेखील भागविली जाईल एवढ्या पुरेशा खोल्या व इतर आवश्यक सेवा-सुविधांनी युक्त अशी नवीन प्राथमिक शाळा इमारत संस्थानच्या खर्चाने बांधून देण्यास व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली आहे.** प्राथमिक शाळेचे स्थलांतर झाल्यावर तिच्या सध्याच्या जमिनीवर प्रथम संस्थान खर्चाने shopping complex मधील दुकान गाळे तळमजल्यावर असलेली नवीन इमारत बांधून तेथे आज रस्त्यांवर अतिक्रमण केलेल्या दुकाने-तथा-टपऱ्यांचे स्थलांतर व पुनर्वसन (गाळ्यांचा खर्च वसूल करून) करण्याचे व वरच्या मजल्यांचा संस्थानच्या वाढत्या विविध गरजा भागविण्यासाठी उपयोग करण्याचे योजण्यात आले आहे. ही योजना सत्वर पुढे रेटण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित संस्था (शिरडी नगरपंचायत, अहमदनगर जिल्हा परिषद व संस्थान) आणि शासकीय अधिकारी प्रयत्नशील आहेत. **शिरडी नगराच्या विकास-योजनेत दर्शविण्यात आलेल्या एकूण आठ रस्त्यांच्या डांबरीकरणावरील खर्च भागविता यावा याकरिता शिरडी नगरपंचायतीस सुमारे रु. ७५ लाखाचे आर्थिक सहाय्य देण्यास व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली आहे. तसेच, जुना व नवीन पिंपळवाडी रस्ता,** जो अव्याहत प्रचंड रहदारीच्या ताणामुळे दरवर्षी बराच डबघाईस येऊन साईभक्तांची व शिरडीवासियांची अतोनात गैरसोय होते, तो **सिमेंट काँक्रिटचा बांधण्याकरितादेखील शिरडी नगरपंचायतीला सुमारे रु. १.६७ कोटी एवढे भरीव अनुदान-वजा-अर्थसहाय्य देण्यास व्यवस्थापन मंडळाने मंजुरी दिली आहे.** शिरडी नगरात सांडपाण्याचा योग्य प्रकारे निचरा होण्याकरिता सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी गटारांची योजना (storm water drainage scheme) तयार करण्यासाठी संपूर्ण सर्वेक्षण करून अशा योजनेचा आराखडा तयार करण्याकरिता अनुभवी सल्लागार संस्थेची (experienced technical consultancy agency) निवड व नियुक्ती करून आवश्यक सर्वेक्षणांती सुयोग्य योजनेचा आराखडा सादर करण्याकरिता अशा संस्थेला जे सल्लाशुल्क (consultancy fee) द्यावे लागेल त्यावरील खर्चापोटी योग्य

प्रमाणात आर्थिक सहाय्य शिरडी नगरपंचायतीस देण्यासही व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली आहे.

७. **अशा रीतीने नव्या सहस्त्रकांत अलिकडेच पदार्पण केल्यावर, आपल्या अखत्यारीतील विविध विकासकामें पार पाडीत असताना त्याबरोबरच शिरडी नगराच्याही विकास व प्रगतीस हातभार लावण्याकरिता विकासाची विविध दालने खुली करून शिरडी संस्थान ही एक आघाडीवर असलेली धर्मादाय विश्वस्त संस्था व विकासयंत्रणा आहे हें कृतीने दाखवून देण्यासाठी विद्यमान व्यवस्थापन मंडळ सर्वतोपरी कटिबद्ध आहे. अशा या अत्यंत महत्त्वाच्या नव्या विकासपर्वातून शिरडी संस्थान कालक्रमण करीत असताना या सर्व भगीरथ प्रयत्नांना निष्कारण काही विघ्नसंतोषी व्यक्तींनी बुद्धिपुरस्सर हाती घेतलेल्या दुर्दैवी कारवायांमुळे खीळ बसू नये, एवढाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.** एका बाजूने विकासाची कामे जलद गतीने होत नाहीत अशी टीका करावयाची व त्याचवेळी दुसऱ्या बाजूने अशी कामे मार्गी लावल्यास उधळपट्टी व भ्रष्टाचार होत असल्याची खोटी टीका व निष्कारण गदारोळ करावयाचा, अशा दुतोंडी प्रचाराला तोंड देण्याची पाळी दुर्दैवाने आमच्यावर आली आहे, असे अत्यंत खेदाने नमूद करावे लागत आहे.

८. विशिष्ट हेतू बाळगून वारंवार अशा रीतीने दूषित करण्यात येणारे वातावरण कायमचे निवळावे या दृष्टीने एकच उपाय आम्हास दिसतो; तो म्हणजे वरील प्रारंभीच्या परिच्छेदांत नमूद करण्यात आलेल्या विविध सर्व आरोपांचा खुलासा तपशीलवारपणे करणारी जीं स्पष्टीकरणे-वजा-निवेदने आम्ही सर्व अनुषंगिक कागदपत्रांसह वेळीच सादर केलेली आहेत आणि ज्यांची शहानिशा व पडताळणी करण्यांचे कार्य दुर्दैवाने बरेच महिने प्रलंबित राहिलेले आहे तें येत्या अधिकाधिक तीन महिन्यांच्या कालावधीत कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना शासनाने मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना तत्काळ द्याव्यात. तशी आग्रहाची व कळकळीची विनंती आम्ही करतो. हें पडताळणी काम सत्वर पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी धर्मादाय आयुक्तालयातील कोणाही वरिष्ठ अधिकाऱ्यावर आपण सोपवावी. तसें केल्यास, वर म्हटल्याप्रमाणे, अधिकाधिक तीन महिन्यांच्या कालावधीत हें काम निश्चितपणे पूर्ण होऊ शकेल, असे आम्हास वाटते. तें पूर्ण होताच आमच्यावर वेळोवेळी करण्यात आलेल्या आरोपांचे निराकरण होऊन ते सर्व आरोप व तक्रारी कशा असत्य, अतिरंजित व निराधार आहेत हे सर्वांना स्पष्टपणे दिसून येईल व नव्याने खोट्यानाट्या तक्रारी करण्यास कोणी धजावणार नाही, आणि यदाकदाचित धजावल्यास त्यांच्यावर कुणीच विश्वास ठेवणार नाही, याची आम्हास मनोमन खात्री आहे.

९. वर विनंती केल्याप्रमाणे प्रलंबित असलेले पडताळणीचे काम सत्वर पूर्ण करून विद्यमान व्यवस्थापन मंडळाच्या उर्वरित कालावधीत वर उल्लेख केलेलीं व इतर विकासकार्ये गतिमान पद्धतीने पूर्ण करण्याचा मार्ग आपण निश्चितपणे सुकर कराल, असा दृढ विश्वास व्यक्त करून आम्ही या लांबलेल्या निवेदनाचा समारोप करतो.

आदरपूर्वक आपले,

(द. म. सुकथनकर) (र. दा. सोनी) (भा. शं. बोरावके) (रा. पुं. रोहोम)

(शा. ल. शहाणे) (चां. ना. डुबे पाटील) (कै. गो. कोते पाटील) (म. सो. दंडवते)

(दे. बं. पवार) (शां. रं. मिराणे) (प्र. रं. पटेल) (डॉ. अ. दि. रासने)

(र. म. केंगे) (डॉ. तु. च. राठोड) (सुनीता वि. क्षीरसागर) परदेशास गेले असून त्यांची या निवेदनास मान्यता आहे. (मो. मो. जयकर)

(प्र. प्र. वैशंपायन)

साई अनुभव

# मुक्तिप्रदायक श्री साई

(कै. नाना सावंत यांच्याविषयीचा साईअनुभव)

शब्दांकन : प्रेमानन्द मर्येकर मुळगांवकर

**श्री** सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज हे अनेकांचे सद्गुरु आहेत; त्याहीपेक्षा ते कित्येकांचे प्रत्ययदायी दैवत आहेत, याची प्रचिती आजही येत आहे.....

.....श्री. संभाजी ऊर्फ नाना विश्राम सावंत, हे श्रद्धावान साईभक्त. 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या देवस्थानचे माजी (सन १९७९-८४) विश्वस्त. नाना पहिल्यांदा श्री क्षेत्र शिरडीला आले ते सन १९५१ मध्ये आणि तेव्हापासून सालोसाल नेमाने येत राहिले. नेमाने येणे दरवर्षीच्या रामनवमी आणि गुरुपौर्णिमा उत्सवांत होई. त्यानंतर पुढे साईबाबांकडे येण्यासाठी पावले ओढ घेऊ लागायची तेव्हा, शक्य होईल त्यावेळी, मनात येईल त्या समयी, प्रसंगोपात आणि बाबांच्या दर्शनाची तळमळ अगदी अनिवार होई त्या क्षणी ते शिरडीला येऊ लागले. प्रत्येक वारीला श्री साईनाथांच्या दर्शनाने ते दुःखकष्ट विसरत. सुखावत. अगदी संजीवनी मिळाल्यागत वागू लागत. "श्री साईबाबा आपले देव" या भावनेने भारावलेले असत.

नानांचे शिरडीला येणे जसजसे वाढत गेले, तसतसा शिरडीतील लहानमोठ्या उत्सवांत व कार्यक्रमांत त्यांचा सहभाग वाढत गेला.

१९९८ साल संपले तेव्हा नानांनी वयाची एकाहत्तरावी पार केली होती. तेव्हापासून ते उर्वरित आयुष्याबद्दल विचार करीत होते. २००० सालच्या रामनवमीनंतर अचानक त्यांनी प्रस्तुत लेखकाच्या ज्योतिषीमित्राला आपली जन्मपत्रिका दाखवली. म्हणाले -

"मला दोनच प्रश्नांची उत्तरे पत्रिकेवरून सांगा. त्यांपैकी एक - मला आयुष्य किती आहे ? दोन - मला मृत्यू कुठे येईल ?"

त्यांच्या मनात वैचारिक लढाई चालू असावी. ती स्पष्ट होण्यासाठी ज्योतिषाने विचारले -

"दुसरा प्रश्न कशासाठी ?"

"मला शिरडीमध्येच मरण यावे, अशी माझी मनोमन इच्छा आहे" - नाना म्हणाले.

त्यांची अंतिम इच्छा. मनात घर करून राहिलेली. भक्तिप्रेमाने परमेश्वराला - श्री साईनाथांना सांकडे घालणारी.

"नाना, पत्रिकेप्रमाणे पंच्याहत्तरीचा योग दिसत नाही. चौऱ्याहत्तर पूर्ण होतील. नंतरचे सरासरी तीन महिने, 'आयुष्याचा बोनस' समजा. म्हणजे निरवानिरव करायला भरपूर वेळ आहे. राहिला प्रश्न मृत्युस्थानाचा. तर होरा असा आहे - मृत्यू पवित्र स्थानी होईल. नेमका कुठे व्हावा, हे श्री साईसमर्थांच्या हाती आहे.....आणि ते तर उदार करुणाकरच आहेत. आपल्या भक्ताला ते कधीही विन्मुख करणार नाहीत. तुम्ही आजवर याचा पुरेपूर अनुभव घेतला आहे. मलाही खात्री आहे, श्री साईबाबा तुमची इच्छा पूर्ण करतीलच" - ज्योतिषीमित्र उत्तरला.

त्या रामनवमीपासून नानांच्या मनातली ही अंतिम इच्छा दिवसेंदिवस दुर्दम्य इच्छेचे रूप घेऊ लागली. २००० व २००१ साली प्रकृती बरीच खालावली. रुग्णालये गाठावी लागली. त्याही स्थितीत ते भेटीअंतीं खुणेने विचारीत - "माझे काय ?"

मरणाची भीती त्यांच्या मनात बिल्कुल नव्हती. त्या भीतीला त्यांच्या मनात अजिबात थारा नव्हता. कारण त्यांच्या दुर्दम्य इच्छेने त्यांचे मन पुरते व्यापून टाकले होते.

कधी बजावीत - "माझे दोन्ही प्रश्न माझ्या घरच्या मंडळींना कधीही सांगू नका."

२००२ ची महाशिवरात्र आली. त्यांनी विचारले - "काय कार्यक्रम ?"

"यावेळी कोकणातील श्री कुणकेश्वराला जाण्याचे ठरते आहे. येता का ?"

"नाही बुवा. माझे माहेर शिरडी. मी तिकडेच जाणार."

नानांचा निर्धार पक्का होता. उण्यापुऱ्या तीन तपांमध्ये, क्रमाक्रमाने त्यांनी गुरुनाम, मूर्तिरूपगुरुसहवास, गुरुकृपा, गुरुचरणपायस आणि गुरुमंत्र प्राप्त करून घेतला होता.

महाशिवरात्रीच्या आधल्या रात्री, नाना, डॉ. गोखले व श्री. रूमडे असे तिघे बसने शिरडीला निघाले. डॉ. गोखले, डॉक्टर व स्नेही म्हणून नानांची काळजी घेत बरोबर होते. प्रवास निर्वेध झाला होता.

महाशिवरात्रीचा दिवस उजाडला. प्रसन्न मनाने नाना, दोन्ही मित्रांना घेऊन काकड आरतीला उभे राहिले. तन्मयतेने आरती

म्हणत राहिले. नंतरची सगळी यथासांग दर्शने झाल्यानंतर, परिचितांना भेटून, चौकशी करून, सर्वांना म्हणाले, ''दुपारच्या आरतीला येणारच आहे, तेव्हा परत भेटतो.''

माध्यान्ह आरतीला अकस्मात त्यांना ज्येष्ठ स्नेही श्री. सी. सो. धानू भेटले. त्यांचा हात आपलेपणाने धरीत ते म्हणाले - ''दादा, तुम्ही इथे उभे रहा, माझ्यापुढे.'' दोघेही साईबाबांच्या समाधीजवळच होते. नाना फिरून फिरून तेच वाक्य बोलत होते; आणि श्री. धानू नानांनाच पुढे उभे राहण्याचा आग्रह करीत होते.

''नाना, तुम्ही आमच्याबरोबरच राहता का ? एकत्रच मग मुंबईला जाऊ'' - श्री धानू स्नेहाने विचारीत होते.

''नाही. मी आजच दुपारच्या गाडीने जाणार. तसं ठरलं आहे.''

तेव्हाही नानांची चलबिचल नव्हती. श्री साईसच्चरिताच्या सकाळी खरेदी केलेल्या दोन प्रती त्यांनी साईबाबांच्या पायांशी ठेवल्या. आरती आटोपताच त्यांनी हात जोडले. मनातल्या मनात त्यांनी प्रार्थना केली. मनातली ती त्यांची प्रार्थना इतरांना कशी कळणार; पण अंतर्यामी साईबाबांनी ती ऐकली.....नानांच्या डोळ्यांत पाणी दाटून आले.

आरतीनंतर नाना आणि त्यांचे मित्र प्रसादालयात प्रसाद घेण्यासाठी गेले. स्वस्थ होते. बरेचसे अबोल होते.

''साईबाबांच्या पोथ्या तुम्हाला व तुमच्या पत्नीला प्रसाद म्हणून देणार आहे'' - डॉ. गोखले यांना ते म्हणाले.

तेथूनच पुढे एस्. टी. स्टँडकडे वळताना, मंदिराकडे येऊन, कळसाकडे पहात त्यांनी हात जोडले. निघाले. दुपारचा १चा सुमार होता. वातावरणात उष्मा होता.

एस्. टी. स्टँडवर ते पोहोचले. गाडी दोन वाजता सुटणार होती. वेळ बराच होता. स्टँडवरच्या पेपरविक्रेत्याच्या दुकानासमोर ते थांबले. चौकशी केली. त्याच्या आग्रहावरून लॉटरीची तीन तिकिटे त्याच्याकडची घेतली. आणि.....

.....आणि एकाएकी नानांनी छातीवर हात दाबून धरला. डॉ. गोखलेंनी त्यांना दोन्ही हातांनी सावरले. ''काय झालं नाना ?'' ते विचारीत होते. तोपर्यंत नानांचे अवसान गळून जात असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. श्री. रूमडे यांच्या मदतीने त्यांनी, बसायला केलेल्या कट्ट्यावर नानांना झोपविले. काही प्राथमिक वैद्यकीय हालचाली केल्या. उपाय करताना त्यांना शंकेने घेरले. त्यांच्या निर्व्याज मैत्रीला जाणवले - नानांचा इहलोकीचा कारभार आटोपला ! हताशपणे ते बसले. त्यांच्या कवेत नानांनी शेवटचा श्वास सोडला होता. नि:शब्द होऊन निमिषभरात.

डॉक्टरांना शोक करीत बसून भागण्यासारखे नव्हते. श्री साईबाबा संस्थानच्या इस्पितळात त्यांनी नानांना नेले. तिथे गेल्यावर संस्थानच्या कार्यालयाला कळविण्यात आले. संस्थानचे प्रशासकीय अधिकारी श्री. प्रकाश देशपांडे यांना कळताच त्यांनी ताबडतोबीने, श्री. धानू व श्री. चं. व. दाभोलकर यांना कळविले. ते दोघेही त्वरेने आले. नानांचा अचेतन देह पाहून ते अगदी सुन्न झाले.

श्री. दाभोलकरांना अकरा तारखेला समाधीमंदिरात रात्रौ ९च्या सुमारास घडलेला प्रसंग आठवला. मंदिरप्रमुख श्री. प्रभाकर गोरक्षकर यांना त्यांच्या कार्यालयात ते सांगत होते - ''महाशिवरात्रीच्या पूजेनिमित्त मी बाबांसाठी अत्तर व प्रसाद आणला आहे. उद्या त्याची व्यवस्था कशी करता येईल ?'' अभावितपणे, त्यावर श्री. गोरक्षकर म्हणाले, ''अहो, संबंध रात्र अंजून जायची आहे. उद्या काय होईल, हे कुणाला सांगता येणार आहे ?''

समोर नानांचा निष्प्राण देह पाहताना हा नियतीच्या खेळाचा संकेत श्री. दाभोलकरांना प्रकर्षाने आठवला.

इस्पितळातल्या डॉक्टरांनी तपासणीअंती अखेरचा निर्णय दिल्यानंतर धावपळ वाढली. श्री. धानू यांनी मनावर दगड ठेवून, मुंबईला नानांच्या घरी दूरध्वनी करून स्पष्ट कल्पना दिली - ''कारभार आटोपला आहे. आम्ही मुंबईला लगेच निघत आहोत. पुढच्या तयारीला लागा.''

दरम्यान, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्याकडून अज्ञाताच्या प्रवासाला निघालेल्या नानांना श्री साईबाबांचे महावस्त्र - पुष्पहार - फुले पाठविण्यात आली. परमेश्वरी प्रेरणेने हे दिव्य अलंकार पाठविण्यात आले. तत्परतेने पाठविण्यात आलेल्या या दिव्यालंकारांनी नानांचा जन्म कृतार्थ झाल्याचे, ''मोक्षार्थी लभते गतीम्'', हे विधान सत्य असल्याचे, सारेजण पहात होते. ईश्वरी लीला अनुभवत होते.

ध्यानीमनी नसताना ती दु:खद वार्ता पोहोचताच नानांच्या निवासस्थानी एकदम आक्रोश झाला. दचकून बाकीच्या रहिवाश्यांनी धाव घेतली. हा.....हा.....म्हणता त्या वस्तीतल्या रस्त्यावर दाटी वाढू लागली.

रात्री सुमारे दहा वाजता, प्रवासात कोणतीही अडचण न येता, शववाहिनी घराजवळ पोहोचली. शिरडी-परेल प्रवासात एक शब्दही बोलू न शकलेले श्री. धानू, श्री. दाभोलकर, डॉ. गोखले, श्री. रूमडे हे बांधव नानांचा चिरनिद्रेतला देह बाहेर घेताच, स्वत:ला सावरू शकले नाहीत.

श्री साईबाबांनी आपल्या भक्ताची दुर्दम्य इच्छा पूर्ण केली होती. शिरडी गावाच्या वेशीच्या आत, श्री खंडोबाच्या दृष्टिपथात, श्रद्धावान भक्ताला, विनायातना चिरंतन विसावा दिला होता. भक्ताची आस पूर्ण करण्यासाठी देवाज्ञा दिली होती.

भक्ताला अखंड 'गुरुगृहवास' प्रदान केला होता. त्याच्या महानिर्वाणात अध्यात्मवृत्तीने बांधले गेलेले नेमके चार बांधव आणि एक चक्रधर सोबत दिला होता. उत्तरक्रियेपूर्वी ताटी उचलण्यासाठी चार आप्त आणि अग्निकुंड धरण्यासाठी पाचवा स्वजन असावा लागतो; ती पंचकव्यवस्था सूचकपणे लावून दिली होती.

शिरडी-परेल प्रवासातही निष्प्राण देहाची पूर्णतः काळजी घेतली होती. देह म्लान होऊ दिला नव्हता.

आणि श्री गुरुस्थानावर मध्यरात्री रूद्रपूजा चालते त्या पवित्र मंगल वेळी - समया - निरांजनांच्या ज्योती तेजाने उजळतात, त्यावेळी, दूर समुद्रवेष्टित स्मशानात अग्निनारायणाला आपले नेमस्त कार्य पूर्ण करण्यास अधिकच दीप्तिमान केले होते. सर्वांगांनी.

श्री. संभाजी ऊर्फ नाना विश्राम सावंत यांना सार्थपणे कैलासलोकी पोहोचविण्याचे कार्य, पंचतत्वे एकवटून, अग्निशिखांच्या सहाय्याने, ऊर्ध्व दिशेला उद्युक्त होऊन, सिद्ध करीत होती.

कारण त्यांना भक्तोद्धार श्री साईबाबांची आज्ञा होती.

# दोन्ही पायांनी अपंग असूनही साईकृपेने व दुर्दम्य इच्छाशक्तीने सलग नऊ वर्षे शिरडी पदयात्रा केली !

मी दोन्ही पायांनी अपंग असून श्री साईबाबांच्या महिमेची पावलोपावली प्रचिती घेत आहे. श्री साईबाबांच्या प्रेरणेने व कृपाशीर्वादाने सन १९७८ साली श्री साईबाबांनीच एक छोटेसे साईमंदिर माझ्याकडून बांधून घेतले. साईमंदिरात सेवा करता करता साईबाबांनी अनेक अनुभव दिले.

साईमंदिर इतके छोटे होते की, भक्तांना मनासारखे पूजापाठ करता येत नव्हते. श्री सद्गुरु साईनाथांच्याच प्रेरणेने राहून राहून मनात एकच विचार यायचा, तो म्हणजे मंदिर मोठे असावे व साईभक्तांची सोय चांगली व्हावी; आणि साईंच्या आज्ञेने सन १९९१ साली साईभक्तांच्या सहकार्याने मंदिराच्या जीर्णोद्धाराचे व पुनर्बांधणीचे काम सुरू झाले. आर्थिक चणचणीमुळे मंदिराचे काम फारच धिम्यागतीने होत होते. सन १९९२ सालच्या अखेरीस छताचे व कळसाखालील कामच पूर्ण झाले. पुढील काम काहीकेल्या पुढे जाईना. आर्थिक चणचण तर होतीच. अनेक प्रयत्न करूनही जवळजवळ दीड वर्षे काम रखडून राहिले. असो.

त्याच दरम्यान अशी गोष्ट कानावर आली की, काही साईभक्त दरवर्षी श्री क्षेत्र शिरडीला पायी दर्शनाला जातात. ही गोष्ट कळल्यानंतर मी साईबाबांना सांकडे घातले की, हे साईनाथा, तुझ्या मंदिराचे सर्व काम पूर्ण होऊन मोठ्या मूर्तीची स्थापना लवकरात लवकर झाली, तर मीही पायी जाणाऱ्या साईभक्तांप्रमाणे तुझ्या दर्शनाला सलग ९ वर्षे पायी येईन; आणि काय आश्चर्य ! दीड वर्षे रखडलेले काम काही दिवसांत श्री साईबाबांनी पूर्ण करून घेतले. त्यावेळी मला बाबांच्या ११ वचनांतील ९ व्या वचनाची आठवण झाली :–

**जाणा येथें आहे सहाय्य सर्वांस ।**
**मागे जें जें त्यास तें तें लाभे ॥**

मी दोन्ही पायांनी अपंग असल्यामुळे अर्थातच अपंगांसाठी असलेल्या पांगुळगाडीला हाताने ढकलत ढकलत मी माझी पायीयात्रा पूर्ण करतो. यंदाचे माझे सांकडे पूर्ण करण्याचे शेवटचे ९ वे वर्ष होते.

श्री साईंवरील श्रद्धेने, साईसेवेने व दुर्दम्य इच्छाशक्तीने माझ्यासारखा अपंगच काय; कोणीही साईभक्त लाचार होऊ शकत नाही, हे अगदी निश्चित.

साईबाबांची कृपा आणि साईभक्तांच्या शुभेच्छा व लोभ सदोदित असावा, हीच साईचरणी विनम्र प्रार्थना.

**– शंकरकुमार शर्मा**
माहिम (प.), मुंबई.



## शिरडीत संपन्न
# रामनवमीचा अनुपम भक्तिसोहळा

- विद्याधर ताठे
कार्यकारी संपादक, साईलीला



मग ते डॉक्टर कथिती नवल।
रामरूप म्या देखिले श्यामल।
ते मी तात्काळ वंदिले निर्मल।
सुंदर कोमल साजिरे॥
(१२:१६०)

**श्री** साईबाबांनी एका मामलेदारासमवेत आलेल्या डॉक्टरांना अशा प्रकारे रामरूपामध्ये दर्शन दिल्याची लीला हेमाडपंत यांनी श्री साईसच्चरितातील अध्याय १२ मध्ये वर्णन केलेली आहे. अशाच प्रकारे एका मद्रासी बाईसही बाबांनी रामरूपात दर्शन दिल्याची कथा अध्याय २९ मध्येही आहे. सारांश, बाबा 'साईराम' असल्याचे या विविध लीलांमधून स्पष्ट होते. या संदर्भामुळेच शिरडी येथे प्रतिवर्षी होणारा रामनवमीचा जन्मोत्सव सोहळा साईभक्तांमध्ये व गावकऱ्यांमध्ये अधिक जिव्हाळ्याचा आहे. स्वत: बाबांनी हा उत्सव सुरू केल्यामुळेही साईभक्तांमध्ये या उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा हा रामजन्मोत्सव दिनांक २० ते २२ एप्रिल दरम्यान मोठ्या थाटामाटाने व भक्तिभावाने साजरा झाला. नेहमीप्रमाणे या उत्सवास उन्हाची तमा न करता हजारो साईभक्तांचा पूर लोटला होता.

फाल्गुन महिन्यात होळी पौर्णिमा होताच साईभक्तांना व शिरडीकर ग्रामस्थांना 'रामनवमी उत्सवा'चे वेध लागतात. चैत्र मासाचे आगमन म्हणजे वसंत ऋतुचे आगमन. कोकिळांच्या कुंजनाने व झाडांवरती आलेल्या नव्या मोहराने सारा आसमंत मोहक धुंद झालेला असतो. 'आषाढस्य प्रथम दिने' हा जसा मोरांना हर्षाचा, उल्हासाचा असतो, तद्वतच 'वसंतस्य प्रथम दिन' कोकिळांना चैतन्यानंदाचा असतो. साईभक्तांच्या मनामध्ये रामनवमी उत्सवाच्या कोकिळा कुंजन करू लागतात. भक्तिप्रेमाचा मनामध्ये पूर लोटतो. साईभेटीसाठी, दर्शनासाठी मनरूपी चातक आसुसतो. अशा अनावर व अनामय ओढीमुळेच शेकडो साईभक्त मुंबई - पुण्याहून उन्हाळ्यातील कडक उन्हाची फिकीर न करता पायी पालखीत सामील होतात. त्यांना ना क्षुधेची आठवण असते, ना तृष्णेची जाणीव. साईधूनमध्ये रंगलेले - दंगलेले मन आणि डोळ्यांपुढे शिरडी एवढीच त्यांची स्थिती असते. साईभक्तीचा हा बेधुंद असा नजारा साईंचीच प्रचीती आपणास करून देत असतो. या पालखी-सोहळ्यातील पदयात्रींचे वाटेत गावोगावी स्वागत होते, कोणी जेवण देतो, कोणी नाश्ता देतो, कोणी ओवाळतो, कोणी लोटांगण घालतो. साईंचे भक्त म्हणून ठिकठिकाणी त्यांना वंदन केले जाते. यंदाच्या रामनवमी उत्सवासाठी मुंबई - पुण्याहून नेहमीच्या परंपरेनुसार अनेक पालख्या आल्या होत्या. त्यामध्ये तरूण साईभक्तांचा भाग विशेष होता.

दरवर्षीप्रमाणे तीन दिवसांच्या रामनवमी उत्सवाचा 'श्रीगणेशा' अष्टमीला पहाटेच्या काकड आरतीपासून झाला. काकड आरतीनंतर प्रथेप्रमाणे वीणा, 'श्री साईसच्चरित' पोथी व बाबांच्या तस्वीरीची शोभायात्रा काढण्यात आली. **''साईनाथ गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायी''** अशा जयघोषात, टाळमृदंगांच्या गजरात समाधी मंदिरातून निघालेली शोभायात्रा दक्षिणद्वाराने बाहेर पडून गुरुस्थान येथे आली. गुरुस्थान येथे ''शिरडी माझे पंढरपूर'' ही आरती झाली आणि समाधी मंदिराला उजवे घालीत शोभायात्रा द्वारकामाईत आली. वाटेत सुवासिनींनी वीणा, पोथी, व तस्वीर घेतलेल्या विश्वस्तांचे पाय धुतले व त्यांना ओवाळले. द्वारकामाईमध्ये हेमाडपंतलिखित 'श्रीसाईसच्चरित' पोथीची यथासांग पूजा करण्यात आली व पोथीच्या अखंड पारायणाचा पावन, मंगल व भक्तियुक्त वातावरणात प्रारंभ झाला. प्रथेनुसार पहिले पाच अध्याय संस्थानच्या विश्वस्तांनी वाचले व पुढील सर्व अध्याय लॉटरीपद्धतीने ज्यांची नावे निघाली त्या साईभक्तांनी वाचले.

पाद्यपूजादि नेहमीचे सोहळे भक्तिभावाने पार पडल्यानंतर संतकवि दासगणूंच्या परंपरेतील कीर्तनकार ह. भ. प. मनुमहाराज यांचे दुपारी समाधी मंदिरात कीर्तन झाले. रात्री साईनगरमधील मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रमांत प्रसिद्ध अभिनेते मच्छिंद्र कांबळी यांच्या नाटकाचा प्रयोग झाला.

रामनवमीनिमित्त समाधी मंदिर परिसर व सर्व गाव सुशोभित करण्यात आला होता. विविध प्रकारच्या कमानी, देखावे साईभक्तांचे मन वेधून घेत होते. समाधी मंदिराच्या शिखरावरील व परिसरातील विद्युतरोषणाई भक्तांच्या मनात दिवाळीसम उत्साह निर्माण करीत होती. संस्थानच्या सर्व इमारतींतील खोल्या भक्तांनी गजबजून गेल्या होत्या. अनेकांना विविध मांडवांमध्ये मोकळ्या जागेत गाद्या टाकून निद्रादेवीच्या आधीन व्हावे लागले

होते. अर्थात, हवेतील उकाड्यामुळे, उष्णतेमुळे बंद खोलीपेक्षा मोकळ्या हवेतील खुल्या जागेवर झोपण्यात अधिक आनंद वाटत होता. बहुतेक साईभक्त गटा-गटाने गप्पा-गोष्टी करीतच रात्री उशिरापर्यंत जागत बसले होते. इथे झोपण्यासाठी कोण आले होते! ते सर्वजण फक्त पहाट होण्याची, पहाटेच्या काकड आरतीच्या वेळेची प्रतीक्षा करीत होते.

रामनवमीच्या मुख्य दिनी पहाटे नेहमीप्रमाणे काकड आरती झाली आणि 'श्री साईसच्चरित पोथी'च्या पारायणाच्या अखंड पाठाची सांगता-समाप्ती करण्यासाठी सारे विश्वस्तगण व भक्तमंडळी शोभायात्रेने साईनामाचा गजर करीत द्वारकामाईत जमली. तेथे विधीयुक्त सांगता-समारंभ झाला आणि पोथी, वीणा व तस्वीरीसह शोभायात्रा गुरुस्थानमार्गे समाधी मंदिरात आली.

**शनिवार, दिनांक २० एप्रिल, २००२**
**'श्री साईसच्चरित' पोथी, वीणा व**
**साईंच्या तस्वीरीची शोभायात्रा**

वीणा : अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर
पोथी : विश्वस्त श्री. प्रकाश वैशंपायन
तस्वीर : विश्वस्त सर्वश्री भास्कर बोरावके व रमेश केंगे

**'श्री साईसच्चरित' पोथीचे अखंड पारायण**

प्रथम अध्याय : विश्वस्त श्री. प्रकाश वैशंपायन
द्वितीय अध्याय : विश्वस्त श्री. शामसुंदर शहाणे
तृतीय अध्याय : श्री. योगेश रासने
चतुर्थ अध्याय : विश्वस्त श्री. प्रकाश वागस्कर
पंचम अध्याय : विश्वस्त श्री. देवराम पवार

**श्री साईंची पाद्यपूजा**

विश्वस्त श्री. राजीव रोहोम व सौ. रोहोम आणि
विश्वस्त श्री. रमेश केंगे व सौ. केंगे

**रविवार, दिनांक २१ एप्रिल, २००२**
**अखंड पारायण समाप्ति शोभायात्रा**

वीणा : अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर
पोथी : विश्वस्त श्री. प्रदीप पटेल
तस्वीर : विश्वस्त सर्वश्री मोहन जयकर व कैलास कोते

**श्री साईंची पाद्यपूजा**

अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर व सौ. सुकथनकर आणि
विश्वस्त डॉ. तुकाराम राठोड व सौ. राठोड

**सोमवार, दिनांक २२ एप्रिल, २००२**
**श्री साईंची पाद्यपूजा**

विश्वस्त डॉ. अरूण रासने व सौ. रासने

**गुरुस्थानात रूद्राभिषेक**

विश्वस्त श्री. रमेश सोनी व सौ. सोनी आणि
विश्वस्त श्री. मधुकर दंडवते व सौ. दंडवते

बाबांचे नित्याचे स्नान व छोटी आरती झाली.

उत्सवानिमित्त संस्थानच्या वतीने अभिषेक, पाद्यपूजा करण्यात आली. या दिवशीचे विशेष म्हणजे बाबांच्या नित्याच्या स्नानासाठी साईभक्त कावडीने पाणी आणतात व समाधीला अभिषेक करतात. शिरडीपासून काही किलोमीटर दूर असलेल्या गोदावरी नदीचे पवित्र जल कावडींनी आणून बाबांच्या समाधीला अभिषेक घालणाऱ्या साईभक्तांची भली मोठी रांग लागली होती. त्या रांगेत महिला होत्या, मुली होत्या, तरूण होते, वृद्ध होते, खेडूत होते, शहरी साक्षर होते. साईंचा दरबार सर्वांसाठी कसा प्रकारे खुला आहे त्याचे सुंदर दर्शन या सोहळ्यातून घडत होते.

प्रथेप्रमाणे सकाळी साडेदहा वाजता रामजन्माचे कीर्तन सुरू झाले. ह. भ. प. मनुमहाराज यांनी आपल्या सुश्राव्य आवाजात भक्तिभावाने रामजन्माची कथा सांगितली. साईभक्त दासगणूविरचित भजनांच्या अत्यंत श्रवणीय अशा चाली ऐकून सारा श्रोतृवर्ग आनंदमग्न झाला होता. मध्यान्ही पाळणा सोडण्यात आला. गुलाल, फुले उधळून रामजन्माचा गजर करण्यात आला. त्यानंतर बाबांची मध्यान्ह आरती झाली. तीर्थप्रसादाचे वितरण करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे रामनवमीला द्वारकामाईवर, दोन नवी निशाणे वाजत-गाजत-मिरवत आणून लावली गेली. साईभक्त श्री. रासने, निमोणकर यांच्यावतीने ही निशाणे संस्थानला दिली जातात. नंतर श्रींच्या सुशोभित अशा रथाची सर्व गावातून मिरवणूक काढण्यात आली. शिरडीकरांनी रस्त्या-रस्त्यावर सडा-रांगोळ्या केल्या होत्या. ठिकठिकाणी लोक रथाचे स्वागत करून हार घालत होते. ओवाळत होते.

रात्री साईंपुढे निमंत्रित कलाकार सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांच्या गाण्यांचा कार्यक्रम झाला. नंतर साईभक्त कलाकारांना आपली कला-सेवा बाबांपुढे रूजू करण्यासाठी रात्रभर समाधी मंदिर उघडे ठेवण्यात आले. हजारो साईभक्तांनी यावेळी साईदर्शन घेण्यात धन्यता मानली. कोणत्याही गडबडीविना रात्रीच्या शांतसमयी, कलाकारांचे भजनस्वर ऐकत, साईंचे रूप डोळे भरून पाहताना अनेक साईभक्तांना जीवन कृतार्थ झाल्याचे समाधान लाभले.

रामजन्मोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी - सांगता दिनी विशेष म्हणजे गुरुस्थानी रूद्राभिषेक पूजा करण्यात आली. ठीक १०.३० वाजता गोपालकाल्याचे कीर्तन सुरू झाले. यमुनातिरी गोपालकृष्णाने गोपालांसमवेत विविध खेळ खेळले त्याचे स्मरण करीत ह. भ. प. मनुमहाराज व संस्थान विश्वस्तांनी विविध खेळ खेळले आणि दहीहंडी फोडण्यात आली. कीर्तनानंतर मध्यान्ह आरती झाली. काल्याचे कीर्तन म्हणजे उत्सवाची सांगता. काल्याचा प्रसाद मिळताच बाबांचे दर्शन घेऊन साईभक्त शिरडीचा निरोप घेऊ लागले. "साईराम", "साईराम" असा जयघोष करीत भरल्या मनाने व जड पावलांनी साईभक्तांनी एस्. टी. स्टँड व आपापल्या गाडींचे वाहनतळ गाठले. ❑❑❑



# संस्थानतर्फे पदयात्रींकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

**श्री** साईबाबांच्या दर्शनासाठी कित्येक पदयात्री मुंबई व अन्य भागांतून शिरडी येथे येत असतात. पूर्वी श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी (दसरा) उत्सवासाठी पालखी घेऊन साईभक्त शिरडीस येत असत. अलिकडे मात्र बहुतेक सर्वच दिवशीं मुंबई - शिरडी मार्गावर पदयात्री, सायकलस्वार दिसत असतात. ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

या पदयात्री व सायकलस्वारांना नाशिक जिल्ह्यातील सिन्नर शहर सोडल्यावर पाथरे, तसेच सायाळे, जवळके, वेस या गावांपर्यंत पिण्याच्या पाण्याच्या समस्येस तोंड द्यावे लागते. हा भाग जिराईत असून येथील शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. येथे गेली सलग तीन वर्षे दुष्काळ पडला असून पावसाचे प्रमाण अत्यंत अल्प झाले आहे. विहिरी, नद्या, नाले कोरडे पडले आहेत. रोजगार हमी योजनेतून मोठ-मोठे बंधारे या भागात झालेले असले तरी पाऊस नसल्याने सर्व निरुपयोगी ठरले आहे.

येथील पाण्याच्या दुर्भिक्षेचा हा प्रश्न संस्थान व्यवस्थापन मंडळाच्या कानावर आल्यावर अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर व व्यवस्थापन मंडळातील त्यांचे सहकारी यांनी २००१ च्या श्री रामनवमी उत्सवासाठी हजारोच्या संख्येने येथे येणाऱ्या पदयात्रींच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून सिन्नर ते शिरडी दरम्यान २५ ठिकाणी सिंथेक्स टाक्या ठेवून त्यांत पाणी व बर्फ टाकून थंड पाणी उपलब्ध करून दिले होते.

या वर्षीही श्री रामनवमी उत्सवासाठी येणाऱ्या पदयात्रींच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

वर्षभर शिरडीस पदयात्री येत असल्याचे लक्षात घेऊन त्यांच्या पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था व्हावी म्हणून बोअरवेल व त्यावर इलेक्ट्रिक पंप बसविण्याचे काम आता व्यवस्थापन मंडळाने हाती घेतले आहे.

पदयात्री प्रामुख्याने सिन्नर शहर सोडल्यावर खोपडी येथील एकमुखी दत्तमंदिराच्या आवारात मुक्कामास असतात. त्यानंतर वावी गाव सोडल्यानंतर सायाळे गावी ते मुक्काम करतात. याचा विचार करून दत्तमंदिर, खोपडी व सायाळे गाव या ठिकाणी बोअरवेल घेण्यात आली असून तिथे इलेक्ट्रिक पंप बसविण्यात आले आहेत व सिंथेक्स टाक्या ठेवण्यात आल्या आहेत.

सायाळे गाव येथील जलपूजनाचा कार्यक्रम शनिवार, दिनांक १३ एप्रिल, २००२ रोजीच्या गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी व्यवस्थापन मंडळाचे सदस्य श्री. चांगदेव डुबे पाटील, श्री. भास्करराव बोरावके, श्री. मधुकर दंडवते, श्री. देवराम पवार, श्री. शामभाऊ मिराणे, श्री. शामसुंदर शहाणे, श्री. दास इनामदार, कार्यकारी अधिकारी श्री. भाऊसाहेब वाक्चौरे, संस्थानचे सर्व प्रशासकीय अधिकारी, इतर पदाधिकारी, श्री. जगताप, तहसीलदार, सिन्नर, श्री. रूपवते, गटविकास अधिकारी, तालुका पंचायत निर्वाचित सदस्य, श्री. देसाई, पोलीस उपनिरीक्षक, वावी, स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्राथमिक शाळेच्या आवारात वृक्षारोपणही करण्यात आले.

संस्थानच्या या उपक्रमाचा फायदा पदयात्रींना तर होणार आहेच; तसाच तो दुष्काळी भागातील गावांना पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे. भविष्यात याच रस्त्यावर अधिक बोअरवेल, निवारा शेड, स्नानगृहे व शौचकुपे अशा सुविधा श्री साईबाबा संस्थान निर्माण करणार आहे.

या उपक्रमाबाबत साईभक्त व परिसरातील नागरिक संस्थानच्या व्यवस्थापनास धन्यवाद देत आहेत.

❑❑❑


# साक्षीभूत दस्तावेज

'रोजनिशी' हा असा लेखनप्रकार आहे की, जर ते लेखन प्रामाणिकपणे लिहिलेले असेल तर तो इतिहासाचा 'साक्षीभूत दस्तावेज' ठरतो. दादासाहेब खापर्डे यांची रोजनिशी हा असाच एक, त्यांचा प्रामाणिकपणा वादातीत असल्यामुळे, त्यांच्या काळातील साक्षीभूत दस्तावेज आहे. दादासाहेबांचा प्रामाणिकपणा वादातीत होता असे म्हणण्याचे कारण हे की, त्यांच्या जीवनचरित्राकडे एकंदरीत पाहिले असता त्यांच्या ठिकाणी सद्गुणांचे, त्यांच्या निखळ स्वभावाचे, दर्शन घडते. त्यांचे व्यक्तिमत्त्व इतके संपन्न होते की, ते विख्यात वकील होते तेवढेच समंजस, उदार मतवादी होते; ते राजकारणधुरंधर होते तेवढेच खिलाडू वृत्तीचे होते; ते श्रीमंत होते तेवढेच दातृत्वभावी होते; ते विद्वान होते तेवढेच विनयशील होते; ते वादविवादपटू होते तेवढेच मनाने शांत होते. म्हणूनच त्यांच्या एकूण रोजनिशीतील त्यांच्या शिरडीतील वास्तव्याच्या रोजनिशीला साईभक्तांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिरडीतील वास्तव्यातील प्रत्येक दिवसाचा दिनक्रम दादासाहेबांनी छोट्या छोट्या वाक्यांत, एकादी कथा सांगावी तसा असा काही तपशीलवार बेमालूमपणे वर्णन केलेला आहे की, तो सर्व दिनक्रम जणूकाही आपल्यासमोरच घडत आहे असा भास होतो. दादासाहेब, साईबाबा देहावतारात असताना, एकूण पाच वेळा शिरडीत आले. याविषयीची अधिक माहिती आणि दादासाहेब खापर्डे व त्यांची पत्नी लक्ष्मीबाई खापर्डे यांची संक्षिप्त जीवनचरित्रे यांचा परिशिष्टांत समावेश करण्यात आला आहे. दादासाहेबांच्या शिरडी वास्तव्यातील रोजनिशीतून सर्वसाधारणपणे तेथे नियमित घडणाऱ्या घटना, ठळक घटना, साईबाबांचा नित्यक्रम कसा होता, साईबाबा भक्त-भाविकांना बोध कसा करवीत असत, औषधोपचार कसा करीत, भक्त-भाविकांवर आलेल्या बिकट प्रसंगातून त्यांची सोडवणूक कशा पद्धतीने करीत असत, प्रत्येक विचार व कृती करण्यापूर्वी, कैलेल्या पुण्याची व पापाची फळे त्या त्या कर्मानुसार पुढील जीवनात भोगावी लागतात हा उपदेश भक्त-भाविकांनी ध्यानात घ्यावा म्हणून पूर्वजन्माच्या व पुनर्जन्माच्या गोष्टी ते कशा सांगत, एकादी गोष्ट मध्येच सोडून देऊन किंवा विस्कळीतपणे सांगून किंवा त्यात गूढता ठेऊन ऐकणाऱ्यास त्यावर विचार करण्यास प्रवृत्त करून श्रोत्याची व ग्रंथवाचनास प्रेरणा देऊन वाचकाची बुद्धी कशी विकसित करीत असत, एक-दुसऱ्याला मदत कसे करायला लावीत, भक्त-भाविकांची काळजी कशी वाहत असत, यांची माहिती मिळते. म्हणूनच दादासाहेबांच्या शिरडी वास्तव्यातील रोजनिशीला 'साक्षीभूत दस्तावेज' म्हणणे अगदी अनुरूप आहे. याचा प्रत्यय देणारे उदाहरण म्हणून दिनांक १९.०१.१९१२ चे घेता येईल. त्या दिवशी शिवसाईभक्त मेघाच्या मृत्यूच्या वेळी साईबाबांनी केलेला विलाप व त्याप्रसंगीची त्यांची मनःस्थिती या हकीकतीचे केलेले वर्णन हृदय हेलावणारे आहे.

मुळात इंग्रजी भाषेत असलेली ही रोजनिशी मराठी वाचकांच्या मागणीनुसार संस्थान मराठी भाषेत प्रकाशित करीत आहे. संस्थानच्या इतर प्रकाशनांप्रमाणेच या प्रकाशनालाही भक्त-भाविकांचा उत्तम प्रतिसाद मिळेल, त्यांना आत्मानंद प्राप्त होईल, उद्बोध होईल व साईशिकवण जीवनात आचरण्यास प्रेरणा मिळेल, या आशेसह,

**द. म. सुकथनकर**
अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

*(संस्थानद्वारा प्रकाशित 'दादासाहेब खापर्डे यांची शिरडी रोजनिशी' या पुस्तकातून)*

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
नवीन प्रकाशन
वाचताना शिरडीत असल्याचा भास
निर्माण करणारी व
क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी
**श्री साईंच्या प्रत्यक्ष सान्निध्यातील**
दादासाहेब खापर्डे यांची
**शिरडी रोजनिशी**



पृष्ठे : १५२

मूल्य : रु. १५ केवळ



# श्री रामनवमी उत्सव २००२




भक्तिसंगीताचा एक क्षण

विनोदी नाटकातील एक दृश्य






काला कीर्तन


काला क्रीडा












श्री साईंचे गुरुस्थान



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

स्थापना वर्ष १९२३

# साईलीला

वर्ष ३ अंक ३

जुलै-ऑगस्ट
२००२

इंटरनेट आवृत्ती
URL:http://www.shrisaibabasansthan.org

संपादक
**द. म. सुकथनकर**

कार्यकारी संपादक
**विद्याधर ताठे**

* कार्यालय *

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६६५५६, ४१६१२९३
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८
ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in

संगणकीय अक्षरजुळणी
संगणकीय विभाग, मुंबई
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

मुद्रण
चिराग प्रिंटर्स, मुंबई

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी
रु. १०००/- (टपालखर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



* गुरुपौर्णिमा *

## अंतरंग

* संपादकीय : विद्याधर ताठे ३
* गुरुगीता - गुरुकृपाप्राप्तीचे सुलभ साधन ५
* नवविधा भक्तीचे माहात्म्य : विद्युल्लता ६
* वादळवाऱ्यातील दीपस्तंभ : विद्याधर ताठे ८
* वैश्विक साहित्यात संत तुकोबांच्या अभंगांचा समावेश ११
* साईबाबा हेच आपले सद्गुरु ! : मनोहर घ. पितळे १२
* ॥ साई उवाच ॥ : संग्राहक - कै. प्र. का. सोमण १५
* अमृत कलश : संग्राहक - सुभाष जगताप १७
* साईंच्या सान्निध्यात - बायजाबाई : सौ. मुग्धा दिवाडकर १९
* ग्रंथ परिचय २३
* साई वंदना २९
* साई अनुभव ३२
* शिरडी वृत्त ३५
* अभिप्राय ३६
* चित्रसूची ३८
* पुस्तकसूची ३९
* आवाहन ४०



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी


## विश्वस्त मंडळ

**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. शांताराम रं. मिराणे | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | ,, | श्री. प्रदीप र. पटेल | ,, |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | ,, | श्री. प्रकाश द. वागस्कर | ,, |
| श्री. भास्कर शं. बोरावके | ,, | श्री. दास ह. इनामदार | ,, |
| श्री. राजीव पुं. रोहोम | ,, | डॉ. अरुण दि. रासने | ,, |
| श्री. शामसुंदर ल. शहाणे | ,, | श्री. रमेश म. केंगे | ,, |
| श्री. चांगदेव ना. डुबे पाटील | ,, | डॉ. विलास द. पोतनीस | ,, |
| डॉ. अजेय चं. गर्जे | ,, | डॉ. तुकाराम च. राठोड | ,, |
| श्री. कैलास गो. कोते पाटील | ,, | सौ. सुनीता वि. क्षीरसागर | ,, |
| श्री. देवराम बं. पवार | ,, | श्री. मधुकर सो. दंडवते | ,, |

श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे (कार्यकारी अधिकारी)